औरंगाबाद, नागपूर, पुणे, अमरावती, लातूर, सोलापूर, कोल्हापूर, नाशिक, मुंबई, जळगांव, रत्नागीरी, ठाणे, पालघर, नंदुरबार, नांदेड, चंद्रपूर, गडचिरोली, अहमदनगर, सातारा या विभागातून एकाच वेळी प्रकाशीत होणारे वृत्तपत्र

माहिती खात्रीची व प्रगतीची, देतो वेध भविष्याचा..

# नौकरी एक्सप्रेस

Marathi-Weekly

RNI.No.MAH/MAR2010/34125

छत्रपती संभाजीनगर

पाने : ८

किंमत : १५.००

वर्ष : १५ वे

अंक : ४० वा

रविवार - २५ ते ३१ मे २०२५

E-mail:naukriexpress.impact@gmail.com | E-Paper : http://naukriexpress.co.in | Post Regd.No. G 2/RNP/AGD-415/2024-26 | किंमत १५/-

## संक्षिप्त ,सरकारी नौकरी शोधताय..

CISF हेड कॉन्स्टेबल पदासाठी भरती — सविस्तर वृत्त पान नं.८..वर

रेल्वे स्थानकाच्या फ्री Wi-Fi सुविधेचा वापर करत झाला IAS अधिकारी — सविस्तर वृत्त पान नं.८..वर

IDBI बँक जूनियर असिस्टंट मॅनेजर भरती — सविस्तर वृत्त पान नं.८..वर

१२ वी पास उमेदवारांसाठी सुवर्णसंधी, बना कमीशन ऑफिसर — सविस्तर वृत्त पान नं.८..वर

IAFC सिव्हिलिअन भरती — सविस्तर वृत्त पान नं.८..वर

NMDC मध्ये ६८३ प्रशिक्षणार्थी भरती — सविस्तर वृत्त पान नं.७..वर

NPCIL ने काकरापार प्रकल्पासाठी विविध पदांसाठी भरती — सविस्तर वृत्त पान नं.७..वर

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये भरती — सविस्तर वृत्त पान नं.७..वर

UPSC चे पूर्वपरीक्षा वेळापत्रक जाहीर — सविस्तर वृत्त पान नं.७..वर

माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश — सविस्तर वृत्त पान नं.७..वर

SCL असिस्टंट भरती — सविस्तर वृत्त पान नं.७..वर

इंजिनीअरिंग प्रवेशाला आता गती — सविस्तर वृत्त पान नं.४..वर

बेकायदा कृत्ये म्हणजे काय? — सविस्तर वृत्त पान नं.४.वर

अहिल्यानगरचे नवे एसपी सोमनाथ घार्गे तर राकेश ओला यांची बृहन्मुंबईत उपायुक्त पदी नियुक्ती — सविस्तर वृत्त पान नं.४..वर

प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी वेबसाईट ठप्प — सविस्तर वृत्त पान नं.४..वर

बँकेत २ हजार ६०० पदांसाठी भरती — सविस्तर वृत्त पान नं.३..वर

कॅबिनेटमध्ये परतले, छगन भुजबळांना अखेर मंत्रालय जाहीर — सविस्तर वृत्त पान नं.३..वर

भारतीय सैन्य दलात ४०३ पदांसाठी भरती — सविस्तर वृत्त पान नं.३..वर

धनंजय मुंडेंचं खातं छगन भुजबळांच्या पारड्यात — सविस्तर वृत्त पान नं.३..वर

DDA कन्सल्टंट भरती — सविस्तर वृत्त पान नं.२..वर

वीज आणि पशुधन : संरक्षणाचे प्रभावी उपाय — सविस्तर वृत्त पान नं.२..वर

मराठी : संकीर्ण परिक्षाभिमुख सराव प्रश्न — सविस्तर वृत्त पान नं.५ वर

सोलापूर ग्रामीण जिल्हा सशस्त्र पोलिस शिपाई भरती - २०१७ — सविस्तर वृत्त पान नं.६ वर

# पशुसंवर्धन विभागातील सहायक आयुक्त पदाच्या ३११ जागांसाठी भरती



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** पशुसंवर्धन विभाग अधिक सक्षम होण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी विविध ठोस निर्णय घेतले आहेत. पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदांपाठोपाठ आता सहायक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून या पदांसाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाने (एमपीएससी) जाहिरात प्रसिद्ध करून प्रक्रिया सुरू केली आहे.

**पशुसंवर्धन विभाग अधिक सक्षम करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांचे ठोस निर्णय**

पशुसंवर्धन विभागाने पूर्ण क्षमतेने काम करण्यासाठी पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी एकापाठोपाठ एक असे महत्वाचे निर्णय घेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या मार्गदर्शनाखाली ठोस पावले उचलण्यास सुरुवात केली आहे.

विभागातील रिक्त पदांमुळे पशुपालक, शेतकरी यांना सेवा देण्यास येणारी अडचण लक्षात घेऊन विभागातील आवश्यक पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला. यापूर्वी त्यांनी पशुसंवर्धन सेवा गट अ मधील पशुधन विकास अधिकारी संवर्गातील २७९५ पदे भरण्यासंदर्भात महाराष्ट्र लोकसेवा आयोगाला मागणी पत्र सादर करण्यात आले.त्यानंतर आता प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करून महाराष्ट्र पशुसंवर्धन सेवा गट अ या संवर्गातील सहायक आयुक्त, पशुसंवर्धन ही ३११ पदे भरण्याचा निर्णय घेण्यात आला असून तसे मागणीपत्र महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे पाठवले. या भरतीची प्रक्रिया वेगाने होण्यासाठी श्रीमती मुंडे यांनी पाठपुरावा केला.एम.पी.एस.सी.ने सहाय्यक आयुक्त, पशुसंवर्धन या संवर्गातील ३११ पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली असून २० जून २०२५ पर्यंत अर्ज मागविले आहेत.

ही भरती प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण करून पशुसंवर्धन विभागाला सक्षम आणि नवीन अभ्यासू अधिकारी मिळणार आहेत.त्यातून ग्रामीण भागातीलपशुसंवर्धन विभागाचे काम आणखी वेगाने व पूर्ण क्षमतेने होण्यास मदत होणार असून पशुपालकांना चांगल्या दर्जाची सेवा मिळणार असल्याचे पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगितले.

# CISF मध्ये हेड कॉन्स्टेबल (GD) पदांची भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**दिल्ली/ प्रतिनिधी/** सेंट्रल इंडस्ट्रियल सिक्युरिटी फोर्स (CISF) कडून क्रीडा कोट्यातून हेड कॉन्स्टेबल/जनरल ड्युटी (GD) पदासाठी भरती जाहीर करण्यात आली आहे. ही भरती विशेषतः खेळाडूंकरिता असून, खेळात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या युवक-युवतींसाठी ही उत्तम संधी आहे.

अर्ज प्रक्रिया १८ मे २०२५ पासून सुरू झाली असून, अर्ज करण्याची अंतिम दिनांक ६ जून २०२५ आहे. इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी अर्ज फक्त ऑनलाइन पद्धतीनेच भरायचा आहे. ऑफलाईन अर्ज स्वीकारले जाणार नाहीत.

या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांनी मान्यताप्राप्त बोर्डामधून १२वी पास केलेली असावी. त्याचबरोबर, संबंधित खेळात त्यांनी राज्य, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेले असणे आवश्यक आहे. केवळ शैक्षणिक पात्रता असून चालणार नाही, खेळातील योगदानाचा पुरावा आवश्यक आहे. १ ऑगस्ट २०२५ रोजी उमेदवाराचे वय किमान १८ वर्षे व कमाल २३ वर्षे असावे. म्हणजेच उमेदवाराचा जन्म २ ऑगस्ट २००२ ते १ ऑगस्ट २००७ दरम्यान झालेला असावा.



अर्ज करण्याची प्रक्रिया

उमेदवार CISF च्या अधिकृत वेबसाइट cisfrectt.cisf.gov.in वर जाऊन अर्ज करू शकतात.

वेबसाइट वर New Registration लिंकवर क्लिक करून प्राथमिक माहिती भरावी.

नंतर लॉगिन करून उर्वरित तपशील भरावेत.

आवश्यक असल्यास शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरा.

सर्व माहिती तपासून अर्ज सबमिट करा.

फॉर्मचा प्रिंटआउट काढून भविष्यासाठी सुरक्षित ठेवा.

सामान्य, ओबीसी आणि ईडब्ल्यूएस प्रवर्गातील उमेदवारांना १०० शुल्क भरावे लागेल. हे शुल्क फक्त ऑनलाइन पद्धतीने स्वीकारले जाईल.

अनुसूचित जाती, जमाती व सर्व महिला उमेदवारांसाठी अर्ज मोफत आहे. ही भरती केवळ क्रीडा कोट्यातून आहे. त्यामुळे खेळाचे प्रमाणपत्र आणि इतर कागदपत्रे योग्य प्रकारे अपलोड करणे आवश्यक आहे. अर्ज करताना सर्व माहिती काळजीपूर्वक भरा आणि वेळेत प्रक्रिया पूर्ण करा. खेळाडूंना देशसेवेची आणि नोकरीची एकत्र संधी लाभण्याचा हा उत्तम प्रसंग आहे!

# पॉलिटेक्निक प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया सुरु



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रम हा नोकरी आणि उद्योगासाठी उपयुक्त पर्याय असून दहावीनंतर अभियंता होण्याचा मार्ग खुला करणाऱ्या पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रिया येत्या २० मे २०२५ पासून सुरू होत असल्याची माहिती उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत (दादा) पाटील यांनी दिली.

पॉलिटेक्निक पदविका अभ्यासक्रम हा नोकरी आणि उद्योगासाठी उपयुक्त पर्याय असून, अल्पकालावधीत तांत्रिक कौशल्य मिळवून रोजगार किंवा उद्योजकतेकडे वाटचाल करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पदविका अभ्यासक्रम शिक्षण महत्त्वाचे आहे. माहिती व तंत्रज्ञानाच्या युगात विद्यार्थ्यांना स्पर्धात्मक क्षमतांनी सज्ज करणाऱ्या या अभ्यासक्रमामध्ये अधिकाधिक विद्यार्थ्यांनी प्रवेश घ्यावा, असे आवाहन उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केले.

तंत्र शिक्षण संचालनालयाने पदविका अभ्यासक्रमांमध्ये १०० टक्के प्रवेश सुनिश्चित करण्याचे उद्दिष्ट ठेवावे. विद्यार्थ्यांना या शाखेकडे आकर्षित करण्यासाठी सर्व महाविद्यालयांनी प्रयत्न करावेत.दहावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी, तंत्रज्ञान व वास्तुकला विषयक तीन वर्ष कालावधीच्या पदविका अभ्यासक्रमामार्फत विद्यार्थी तंत्रज्ञ, अभियंता व यशस्वी उद्योजक होऊ शकतात, असेही श्री.पाटील सांनी सांगितले.

शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करिता प्रथम वर्ष पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेश प्रक्रियेचा तपशील, वेळापत्रक, नाव नोंदणी व अर्ज भरण्यासाठी https://dte.maharashtra.gov.in या अधिकृत संकेतस्थळाला भेट देण्याचे आवाहन विभागामार्फत करण्यात आले आहे.

# 'टेट' परीक्षेला २७ मे पासून सुरुवात, दोन टप्प्यात होणार परीक्षा

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या शिक्षक अभियोग्यता व बुद्धिमत्ता चाचणी परीक्षेचे (टेट) दोन टप्प्यांत आयोजन करण्यात आले आहे. त्यानुसार या परीक्षा २७ ते ३० मे आणि दोन ते पाच जून या कालावधीत घेतली जाणार असल्याचे परीक्षा परिषदेच्या आयुक्त अनुराधा ओक यांनी सांगितले.

राज्याच्या शिक्षण विभागातर्फे शिक्षक भरतीची प्रक्रिया राबवली जात आहे. त्यादृष्टीने 'टेट' परीक्षा आवश्यक आहे. या परीक्षेत गुणवत्तेसह उत्तीर्ण होणार्या उमेदवारांना शिक्षक भरतीत संधी देण्यात येते. उमेदवारांच्या स्पर्धा परीक्षा किंवा इतर परीक्षा असल्यास, संबंधितांकडून माहिती संकलित केली आहे. संबंधित विद्यार्थ्यांना त्यांच्या परीक्षांच्या तारखा विचारात घेऊन 'टेट' परीक्षेची तारीख दिली जाणार आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची काळजी घेऊन विद्यार्थ्यांच्या परीक्षांचे नियोजन केले जाणार आहे. परीक्षा परिषदेच्या माध्यमातून घेतल्या जाणाऱ्या 'टेट' परीक्षेसाठी दोन लाख ३६ हजार ५९१ उमेदवारांनी अर्ज केले होते; परंतु दुबार अर्ज, शुल्क न भरलेले वगळून दोन लाख २७ हजार २२९ उमेदवारांचे अर्ज अंतिम केले आहेत.

**पुढील वृत्त पान नं.३ वर**

# परदेशी शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज करण्यास ६ जूनपर्यंत मुदतवाढ


## इच्छुक विद्यार्थ्यांनी अर्ज करावेत - मंत्री अतुल सावे

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/**राज्यातील विमुक्त जाती व भटक्या जमाती (विजाभज), इतर मागास वर्ग (इमाव) आणि विशेष मागास प्रवर्ग (विमाप्र) मधील विद्यार्थ्यांसाठी परदेश शिक्षण शिष्यवृत्ती योजनेंतर्गत अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १७ मे २०२५ अशी होती. ही मुदत वाढवून ६ जून २०२५ पर्यंत करण्यात आली आहे. तरी इच्छुक विद्यार्थ्यांनी परदेश शिक्षण शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावेत, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले आहे.

परदेशातील क्यूएस (QS) रँकिंग २०० मधील परदेशी संस्थांमध्ये २०२५-२६ या शैक्षणिक वर्षासाठी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदवीका तसेच पीएच.डी. अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या ७५ विद्यार्थ्यांना दरवर्षी शिष्यवृत्ती मंजूर केली जाते. ही शिष्यवृत्ती शाखानिहाय व अभ्यासक्रमनिहाय दिली जाते.

परदेशी शिष्यवृत्तीसाठी अर्जाचा नमुना, शासन निर्णय, शिष्यवृत्तीसाठी पात्रतेच्या अन्य महत्त्वाच्या अटी व शर्ती इत्यादी सविस्तर माहिती विभागाच्या www.maharashtra.gov.in किंवा https://obcbahujankalyan.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विद्यार्थ्यांनी अर्ज या संकेतस्थळावरुन डाउनलोड करून, परिपूर्ण अर्ज आवश्यक कागदपत्रांसह ६ जून २०२५ रोजी सायंकाळी ०६.१५ वाजेपर्यंत समक्ष किंवा पोस्टाने इतर मागास बहुजन कल्याण संचालनालय, आकार प्रिमायसेस,




दुसरा मजला, एम. एच. बी. कॉलनी, म्हाडा कमर्शिअल कॉम्प्लेक्स समतानगर, येरवडा पुणे-४११००६ येथे दोन प्रतीत सादर करावा.

# KGMU नर्सिंग ऑफिसर ७३३ पदांसाठी भरती

किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी, लखनऊने ७३३ नर्सिंग ऑफिसर पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. इच्छुक उमेदवार २५ एप्रिल २०२५ पासून अधिकृत वेबसाइटवर अर्ज करू शकतात. लखनऊमधील किंग जॉर्ज मेडिकल युनिव्हर्सिटी (KGMU) ने २०२५ साठी नर्सिंग ऑफिसर म्हणजेच सिस्टर ग्रेड-II पदांसाठी भरती प्रक्रिया सुरू केली आहे. ही भरती नर्सिंग क्षेत्रात करिअर घडवू इच्छिणाऱ्या पात्र उमेदवारांसाठी एक मोठी संधी आहे. अर्ज प्रक्रिया २५ एप्रिल २०२५ पासून सुरू झाली असून, इच्छुक आणि पात्र उमेदवार अधिकृत वेबसाइट www.kgmu.org वर जाऊन ऑनलाईन अर्ज करू शकतात.

या भरतीद्वारे एकूण ७३३ पदे भरली जाणार असून त्यामध्ये १०७ पदे बॅकलॉग अंतर्गत आणि ६२६ पदे सामान्य भरती अंतर्गत आहेत. या पदांसाठी उमेदवारांची निवड संगणक आधारित लेखी परीक्षेद्वारे (CRT) केली जाणार आहे. निवड झालेल्या उमेदवारांना सातव्या वेतन आयोगानुसार ४४,९०० ते १,४२,४०० पर्यंतचा मासिक पगार मिळणार आहे. या पदांसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांकडे मान्यताप्राप्त संस्थेमधून B.Sc नर्सिंग किंवा पोस्ट बेसिक इ.डल नर्सिंग पदवी असणे आवश्यक आहे.



याशिवाय, जनरल नर्सिंग आणि मिडवाइफरी (GNM²) डिप्लोमा असलेले उमेदवारही अर्ज करू शकतात, मात्र त्यांच्याकडे किमान ५० खाटांचे रुग्णालयात दोन वर्षांचा अनुभव असावा. उमेदवाराचे वय १ जानेवारी २०२५ रोजी १८ ते ४० वर्षांदरम्यान असावे. अनुसूचित जाती, जमाती, इतर मागासवर्गीय व आर्थिक दुर्बल घटकांतील उमेदवारांना वयोमर्यादेत सवलत दिली जाईल.

अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी प्रथम घत्र्व्वण च्या अधिकृत संकेतस्थळावर जाऊन "Nursing Officer Recruitment 2025' या लिंकवर क्लिक करावे. त्यानंतर नोंदणी करून लॉगिन माहिती प्राप्त करावी. फॉर्ममध्ये सर्व आवश्यक माहिती भरून आवश्यक कागदपत्रं अपलोड करावीत. नंतर संबंधित श्रेणीनुसार शुल्क भरावे. सर्वसाधारण, ओबीसी व ईडब्ल्यूएससाठी २,३६० तर अनुसूचित जाती-जमातीसाठी १,४१६ शुल्क आहे. त्यानंतर अर्ज सादर करून त्याची छायांकित प्रत सुरक्षित ठेवावी.

चयन प्रक्रियेअंतर्गत १०० बहुपर्यायी प्रश्नांची परीक्षा घेतली जाईल. परीक्षेसाठी २ तासांचा कालावधी दिला जाईल. यानंतर पात्र उमेदवारांची दस्तऐवज पडताळणी केली जाईल. ही भरती नर्सिंग क्षेत्रात स्थिर आणि प्रतिष्ठित नोकरी मिळवण्याची उत्तम संधी आहे. इच्छुक उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रांसह लवकर अर्ज करून ही संधी साधावी.

# 'जेईई-डव्हान्स'च्या प्रश्नसंख्येत घट

पहिल्या सत्रात पेपर-१ आणि दुसऱ्या सत्रात पेपर-२ घेण्यात आला. या दोन्ही पेपरमध्ये भौतिक, रसायन आणि गणित असे तीन विभाग होते. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत ५४ प्रश्न होते. म्हणजेच प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी १८ प्रश्न विचारण्यात आले. गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा विचारलेल्या प्रश्नांची संख्या ४८ने कमी होती. गेल्या दोन वर्षांत जेईई डव्हान्स परीक्षेत १०२ प्रश्न विचारण्यात आले होते.

देशभरातील आयआयटी संस्थांमध्ये अभियांत्रिकी प्रवेशासाठी आवश्यक असलेली जेईई डव्हान्स परीक्षा १८ मे रोजी देशभरात पार पडली. दोन सत्रांत घेतलेल्या या परीक्षेत विचारण्यात आलेल्या प्रश्नांची संख्या दोन वर्षांच्या तुलनेत ४८ने कमी झाली. ही संख्या गेल्या १० वर्षांच्या तुलनेत जवळपास निम्मी होती. प्रश्नपत्रिकेतील भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित या तीन विभागांमधील प्रत्येक विषयासाठी १८ असे ५४ प्रश्न विचारण्यात आले.

जेईई मुख्य परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या निवडक विद्यार्थ्यांना जेईई डव्हान्स परीक्षा देता येते. ही परीक्षा उत्तीर्ण होणाऱ्या विद्यार्थ्यांना देशातील आयआयटी संस्थांसह अन्य अभियांत्रिकी संस्थांमध्ये प्रवेश घेण्याचा मार्ग मोकळा होतो. यंदा ही परीक्षा नुकत्याच झालेल्या रविवारी घेण्यात आली. तीन तासांच्या कालावधीत दोन सत्रांत झालेली ही परीक्षा १८० गुणांची झाली. पहिले सत्र सकाळी नऊ ते दुपारी १२ आणि दुसरे सत्र दुपारी २.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत घेण्यात आले.

पहिल्या सत्रात पेपर-१ आणि दुसऱ्या सत्रात पेपर-२ घेण्यात आला. या दोन्ही पेपरमध्ये भौतिक, रसायन आणि गणित असे तीन विभाग होते. प्रत्येक प्रश्नपत्रिकेत ५४ प्रश्न होते. म्हणजेच प्रत्येक विषयासाठी प्रत्येकी १८ प्रश्न विचारण्यात आले. गेल्या दोन वर्षांच्या तुलनेत यंदा विचारलेल्या प्रश्नांची संख्या ४८ने कमी होती. गेल्या दोन वर्षांत जेईई डव्हान्स परीक्षेत १०२ प्रश्न विचारण्यात आले होते.

सन २०१५मध्ये झालेल्या जेईई डव्हान्स परीक्षेत १२० प्रश्न विचारण्यात आले होते. २०२०मध्येही प्रश्नसंख्या १२० एवढीच होती. त्या तुलनेत यंदा प्रश्नांची संख्या निम्म्यापेक्षा कमी झाली. सन २०२०नंतर प्रश्नसंख्या सतत बदलत राहिली आहे.

२०१६ ते २०२० या पाच वर्षांमध्ये जेईई डव्हान्स परीक्षेत १०८ प्रश्न विचारण्यात आले. त्यानंतर २०२१मध्ये परीक्षेतील प्रश्नांच्या संख्येत वाढ झाली होती. सन २०२१मध्ये परीक्षेमध्ये ११४ प्रश्न विचारण्यात आले होते. २०२३ आणि २०२४ या दोन वर्षांमध्ये १०२ प्रश्न विचारण्यात आले होते. त्यामुळे यंदाची प्रश्नसंख्या ही गेल्या दहा वर्षांच्या तुलनेत सर्वांत कमी आहे.

# 'सीबीएसई'मध्येही मराठी!

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** राज्य सरकार नवे राष्ट्रीय शिक्षण धोरण (एनईपी), राष्ट्रीय अभ्यासक्रम आराखडा (एनसीएफ) यांचे दाखले देत राज्य शिक्षण मंडळाच्या शाळांमध्ये पहिलीपासून तिसरी भाषा लागू करण्याच्या प्रयत्नात असताना 'सीबीएसई'ने प्राथमिक शिक्षण मातृभाषेतूनच हवे, अशी भूमिका जाहीर केली आहे. याबाबतच्या मार्गदर्शक सूचनांचे २२ मे २०२५ रोजीचे परिपत्रक 'सीबीएसई'ने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केले आहे. त्यामुळे येत्या शैक्षणिक वर्षापासून राज्यातील सीबीएसई शाळांमध्ये विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून किंवा राज्यभाषा म्हणजेच मराठीतून शिक्षण मिळण्याची शक्यता आहे.

'सीबीएसई'ने जाहीर केलेल्या या मार्गदर्शक सूचनांमध्ये आर-१ आणि आर-२ अशा दोनच भाषांचा उल्लेख आहे. विविध राज्यांमधील शाळांनी 'एनसीएफ' अंमलबजावणी समिती मेअखेरपर्यंत स्थापन करून अभ्यासक्रमात योग्य ते बदल करणे आवश्यक आहे, असे त्यात म्हटले आहे. 'एनसीएफ'च्या शिफारसीनुसार शाळेत शिक्षणाची पहिली भाषा म्हणजे आर-१ ही विद्यार्थ्याची मातृभाषा किंवा त्या प्रदेशातील वा राज्याची भाषा असावी. 'सीबीएसई'ने याच तत्त्वाला प्राधान्य देत तीन ते आठ वर्षांपर्यंत म्हणजेच पूर्व प्राथमिक ते इयत्ता दुसरीपर्यंत विद्यार्थ्यांना या भाषेतच संपूर्ण शिक्षण द्यावे, असे सुचवले आहे.

पुढील प्राथमिक शिक्षणासाठी म्हणजे इयत्ता तिसरी ते पाचवीपर्यंत विद्यार्थ्यांना ही आर-१ किंवा पहिली भाषा पुढे शिकता येईल. मात्र, विद्यार्थ्यांना इतर भाषेत म्हणजे आर-२मध्ये शिक्षण हवे असेल, तर तेदेखील उपलब्ध व्हावे, असे 'सीबीएसई' ने सुचवले आहे. ही भाषा इंग्रजी, हिंदी किंवा इतर कोणतीही असू शकते. मात्र, त्यासाठी आर-२ भाषेत विद्यार्थ्यांनी प्राथमिक शिक्षण घेण्याएवढे प्राविण्य मिळवले असणे अपेक्षित आहे.

हे बदल घडवण्यासाठी 'सीबीएसई' ने रूपरेषा आखली असून, सर्व शाळांनी मे २०२५च्या अखेरपर्यंत 'एनसीएफ अंमलबजावणी समिती' स्थापन करण्याचे निर्देश बोर्डाने दिले आहेत. ही समिती विद्यार्थ्यांची मातृभाषा नोंदवणे, भाषा शिक्षणासाठी लागणाऱ्या साधनांची पूर्तता करणे, अभ्यासक्रमातील आवश्यक समायोजन यांची जबाबदारी पार पाडेल. या सुटीच्या काळात शाळांना अभ्यासक्रम आणि शिक्षणसामग्रीची फेररचना आर-१ म्हणजे मातृभाषा अथवा राज्यभाषा माध्यमातून शिकवण्यासाठी करायची आहे. तसेच आर-२ किंवा दुसरी भाषा योग्य टप्प्यावर सुरू करण्याचे नियोजनही करायचे आहे. यासाठी शिक्षकांना बहुभाषिक अध्यापन, वर्गातील भाषा-संवेदनशील पद्धती आणि मूल्यमापन यांवर प्रशिक्षणही द्यावे लागणार आहे.अंमलबजावणीची प्रत्यक्ष सुरुवात जुलै २०२५ पासूनच अपेक्षित आहे. मात्र, काही शाळांना साहित्यसंकलन, शिक्षकांचे पुनर्वाटप किंवा अभ्यासक्रम समायोजनासाठी अधिक वेळ हवा असल्यास, त्यांना मर्यादित अवधी दिला जाणार आहे. मात्र, त्यात फार विलंब होता कामा नये, असा स्पष्ट इशारा बोर्डाने दिला आहे.

शिक्षक कुठून आणणार?

राज्यातील बहुतांश 'सीबीएसई' शाळांमध्ये मराठी विषय सक्तीचा असूनही तो शिकवला जात नसल्याचा आरोप याआधी वारंवार झाला होता. या पार्श्वभूमीवर आता थेट शिक्षणाचे माध्यमच मराठी असावे, असे 'सीबीएसई' ने सुचवल्यामुळे शाळांची तारांबळ उडणार आहे. या पार्श्वभूमीवर मुंबईतील एका 'सीबीएसई' शाळेच्या मुख्याध्यापकांना विचारले असता, सर्व विषय मराठीत शिकवता येणारे शिक्षकच आमच्याकडे नसल्याचे त्यांनी सांगितले.

मातृभाषेतून देणेच शिक्षणशास्त्राच्या दृष्टीने योग्य असते. आता 'सीर्बीएसई'ने प्राथमिक शिक्षण मातृभाषा किंवा शाळा ज्या राज्यात आहे, त्या राज्याच्या भाषेतच द्यावे, असे सांगितल्याने राज्यातील 'सीबीएसई' शाळांना पाचवीपर्यंतचे शिक्षण मराठीत देण्यास सुचवले गेले आहे.

**- मिलिंद नाईक,**
**प्राचार्य, ज्ञान प्रबोधिनी प्रशाळा व सदस्य,**
**महाराष्ट्र सुकाणू समिती**

## संक्षिप्त

### सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्तीसाठी राज्याच्या दौऱ्यादरम्यान राजशिष्टाचार



**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांच्या मुंबई तसेच राज्यात अन्यत्र दौऱ्यादरम्यान विहीत राजशिष्टाचाराचे पालन होण्यासाठी मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.महाराष्ट्र राज्य अतिथी नियम-२००४ अनुसार घोषित करण्यात आलेल्या राज्य अतिथींच्या यादीत समाविष्ट असणाऱ्या तसेच ज्यांना राज्य अतिथी समजण्यात येत आहे अशा मान्यवरांची विमानतळावर स्वागताची व निरोपाची व्यवस्था राजशिष्टाचार उपविभागाकडून करण्यात येते. तसेच जिल्ह्यांच्या ठिकाणी संबंधित जिल्ह्याचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातील राजशिष्टाचार अधिकारी राज्य अतिथीचे स्वागत करण्यासाठी व त्यांना निरोप देण्यासाठी योग्य ती व्यवस्था करतात.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती यांना कायमस्वरुपी राज्य अतिथी (PERMANENT ST-TE GUEST) म्हणून घोषित करण्यात येत आहे.त्यानुसार, सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती हे महाराष्ट्र राज्य अतिथी नियम, २००४ नुसार यापुर्वीपासून घोषित राज्य अतिथी असल्याने त्यांना महाराष्ट्र राज्याच्या दौ-यादरम्यान अनुज्ञेय राजशिष्टाचारविषयक सुविधा (निवास, वाहन व्यवस्था व सुरक्षा, इ.) पुरवण्यात येतात व अशा सर्व सुविधा त्यांना राज्यात सर्वत्र दौऱ्यादरम्यान अनुज्ञेय राहतील.

सर्वोच्च न्यायालयाचे मुख्य न्यायमूर्ती हे महाराष्ट्र राज्यात मुंबई दौ-यावर असताना मुख्य सचिव अथवा त्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी, पोलीस महासंचालक अथवा त्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी आणि राज्यात अन्यत्र संबंधित जिल्हाधिकारी अथवा त्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी तसेच पोलीस आयुक्त / पोलीस अधीक्षक अथवा त्यांचे वरिष्ठ प्रतिनिधी यांनी मान्यवरांचे स्वागत करावे.

सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ०७ मार्च २०२२ रोजीच्या परिपत्रकानुसार, महाराष्ट्र राज्याला भेट देणारे मान्यवर / अतिथी यांच्या भेटीदरम्यान ज्या विभागाच्या कामकाजासंदर्भात भेट देत असतील त्या विभागाने मान्यवरांच्या स्वागतासाठी व समन्वयासाठी संपर्क अधिकारी नेमण्याबाबत विहित केले आहे. त्यानुसार, मान्यवरांच्या मुंबई भेटीदरम्यान विधि व न्याय विभाग, मंत्रालय, मुंबई यांनी तसेच राज्यातील अन्य जिल्हा येथील दौ-यादरम्यान संबंधित न्यायालय यांनी जिल्हाधिकारी यांच्या सहकार्यान गट अ-श्रेणीतील राजपत्रित दर्जाचे संपर्क अधिकारी नेमावेत.

या मार्गदर्शक सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करण्याचे निर्देश सर्व संबंधितांना देण्यात आले असल्याचे सामान्य प्रशासन विभागाच्या परिपत्रकात नमूद करण्यात आले आहे.

# वीज आणि पशुधन : संरक्षणाचे प्रभावी उपाय

राज्यात सध्या अवकाळी पावसाचे आणि वादळी वाऱ्यांचे प्रमाण वाढले आहे आणि यामुळे वीज पडण्याच्या घटनांमध्येही वाढ झाली आहे. मान्सूनपूर्व काळात, विशेषत: शेतीच्या कामांच्या वेळी, वीज पडण्याचा धोका अधिक असतो आणि यामुळे पशुधनाची हानी होण्याची शक्यता वाढते. भारतामध्ये महाराष्ट्रात वीज पडून मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्या सर्वाधिक आहे. मराठवाडा आणि विदर्भासारख्या भागांमध्ये भौगोलिक रचना, कमी झाडी आणि हवामानातील बदलांमुळे हा धोका अधिक जाणवतो. वीज पडल्याने केवळ पशुधनच नव्हे, तर शेतकरी आणि मालमत्तेचेही मोठे नुकसान होते. जीवितहानी सुध्दा होते. त्यामुळे पशुपालकांनी आपल्या पशुधनाचे वीजेपासून संरक्षण करण्यासाठी योग्य उपाययोजना करणे अत्यंत आवश्यक आहे. विजेपासून पशुधनाचे संरक्षण कसे करावे तसेच करावयाच्या उपाययोजनाबाबत माहिती देणारा लेख

वीज पडण्याची कारणे :

वीज पडण्याची काही प्रमुख कारणे खालीलप्रमाणे आहेत :

विद्युत भार (Electric Charge): ढगांमधील पाण्याच्या थेंबांचे आणि बर्फाच्या कणांचे घर्षण होऊन सकारात्मक आणि नकारात्मक विद्युत भार निर्माण होतो.विद्युत क्षेत्र (Electric Field): ढग आणि जमीन यांच्यातील विद्युत भाराचे अंतर वाढल्याने एक शक्तिशाली विद्युत क्षेत्र तयार होते. जेव्हा हे क्षेत्र हवेच्या प्रतिकारापेक्षा अधिक होते, तेव्हा वीज जमिनीवर कोसळते. तापमान आणि आर्द्रता (Temperature and Humidity): उष्ण आणि दमट हवामान ढगांची जलद निर्मिती करते, ज्यामुळे विद्युत भार लवकर वाढतो.भौगोलिक घटक (Geographical Factors): उंच झाडे, पर्वत किंवा धातूच्या वस्तू वीज आकर्षित करू शकतात.

पशुधनाचे वीजेपासून संरक्षण करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना :पशुपालकांनी आपल्या पशुधनाला वीजेच्या धोक्यापासून वाचवण्यासाठी खालील उपाययोजनांचा अवलंब करणे गरजेचे आहे. सुरक्षित आश्रय (Safe Shelter):जनावरांना कधीही मोकळ्या जागेत बांधू नये.पावसाचे वातावरण आणि विजेचा गडगडाट होत असल्यास शेतातील काम त्वरित थांबवून जनावरांना गोठा, शेड किंवा मजबूत इमारतीमध्ये हलवावे.गोठ्याचे छत आणि भिंती शक्यतो धातूच्या नसाव्यात, कारण धातू वीज आकर्षित करतात. जर धातूचे





Fig. 1. Negative (-) and positive (+) charges build to create a lightning stroke.

बांधकाम असेल, तर ते व्यवस्थितरित्या अर्थिंग केलेले असावे.अचानक आलेल्या वादळात स्वतः चा बचाव (Self-Protection During Sudden Storms) :जर तुमच्या अंगावरचे केस उभे राहत असतील किंवा त्वचेला मुंग्या येत असतील, तर तुमच्यावर वीज कोसळण्याची शक्यता आहे.

अशा स्थितीत त्वरित जमिनीवर पाय गुडघ्यात दुमडून एकमेकांना जोडावेत, त्याभोवती हातांचा विळखा घालावा आणि हनुवटी गुडघ्यावर दाबून धरावी.जनावरांना शक्य असल्यास खाली बसवावे. वातावरण शांत झाल्यावर त्वरित सुरक्षित ठिकाणी आश्रय घ्यावा.अचानक गडगडाट होत असल्यास आणि जवळपास फक्त झाडेच असतील, तर झाडाच्या उंचीच्या दुप्पट अंतरावर जमिनीवर वाकून बसावे.जनावरे पाण्यात असल्यास त्यांना त्वरित बाहेर काढावे, कारण पाणी विजेचे सुवाहक असते.वीज सुवाहकांपासून सावधगिरी (Caution with Lightning Conductors):गोठ्यातील लोखंडी पत्रे, वीजवाहक तारा किंवा विद्युत उपकरणांना स्पर्श करणे टाळावे.गोठ्यातील वीज कनेक्शन आणि विद्युत अर्थिंग योग्य तसेच सुरक्षित असल्याची खात्री करावी. अर्थिंगमुळे वीज जमिनीत सुरक्षितपणे जाते आणि जनावरांना धोका टळतो.

विद्युत उपकरणांचा वापर टाळा (-void Electrical Appliances):आकाशात गडद काळे ढग जमून गडगडाट होत असल्यास गोठ्यातील कोणतेही विद्युत उपकरण चालू करू नये.पशुधनाचे गोठे, कडबाकुट्टी यंत्र आणि गोठ्यातील इतर विजेचे साहित्य योग्यरीत्या अर्थिंग केलेले असावे.

धातूच्या वस्तूंपासून दूर राहा (Stay -way from Metal Objects):जनावरांजवळ धातूच्या वस्तू (उदा. लोखंडी साधने) ठेवू नयेत. शेतात काम करणाऱ्या व्यक्तींनी धातूच्या वस्तू जसे की कुऱ्हाड, कोयते, छत्री त्वरित दूर टाकाव्यात. धातूची पाणीपात्रे उंच ठिकाणी किंवा मैदानातील खुल्या जागी ठेवू नयेत, कारण त्या वीज आकर्षित करू शकतात.

स्थानिक हवामानाकडे लक्ष देणे (Pay -ttention to Local Weather):हवामान खात्याच्या सूचनांचे नियमितपणे पालन करावे. दामिनी प (Damini App): भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्था पुणे (IITM²) आणि भारतीय हवामान विभागाने विकसित केलेले 'दामिनी वीज चेतावणी प' डाउनलोड करावे. या पच्या माध्यमातून परिसरातील हवामानाचा आणि वीज पडण्याचा अंदाज मिळतो, ज्यामुळे वेळीच सुरक्षितता बाळगता येते.वादळी वारे किंवा वीज पडण्याची शक्यता असल्यास जनावरांना गोठ्यातच ठेवावे.

जनावरांचे व्यवस्थापन (animal Management):गडगडाटाने जनावरे घाबरण्याची शक्यता असते, त्यामुळे त्यांना प्रेमळ वागणूक देऊन शांत करावे.गोठ्यात योग्य तापमान आणि आर्द्रता राखण्यासाठी पंखे किंवा फॉगरचा वापर करावा.जनावरांना पाणी आणि खनिज मिश्रणासह संतुलित आहार द्यावा, ज्यामुळे त्यांची रोगप्रतिकारशक्ती वाढते.

तांत्रिक उपाय (Technical Measures):गोठ्यांवर वीजरोधक यंत्रणा (लाइटनिंग अरेस्टर) बसवावी. ही यंत्रणा वीजेचा झटका जमिनीत सुरक्षितपणे पोहोचवते.स्वयंचलित तापमान आणि आर्द्रता नियंत्रण प्रणालीचा वापर करावा.

इतर सुरक्षितता उपाय (Other Safety Measures): **झाडाखाली आश्रय टाळा:** उंच झाडे वीज आकर्षित करतात. त्यामुळे वीज पडण्याचा धोका असताना झाडाखाली स्वतः आणि जनावरांना बांधू नये. पावसामुळे मृत्यू होणार नाही, पण झाडाखाली थांबल्यास धोका निर्माण होऊ शकतो.शेतामध्ये काम करत असताना आपण आणि जनावरे विद्युत तारांपासून किमान ५० फूट अंतरावर राहावे.बैलांना नांगरत असताना तात्काळ लोखंडी जू पासून वेगळे करावे.

आपत्कालीन उपचार (Emergency Treatment):जर एखाद्या जनावरावर वीज पडली, तर त्वरित पशुवैद्यकीय मदत घ्यावी.

जागरूकता (awareness):पशुपालकांना वीज पडण्याचे धोके आणि त्यावरील बचाव उपायांबाबत माहिती द्यावी.

नैसर्गिक आपत्तीमुळे होणाऱ्या नुकसानीसाठी मदत (Assistance for Losses Due to Natural Disasters):नैसर्गिक आपत्तीमुळे बाधित झालेल्या व्यक्तींना केंद्र आणि राज्य आपत्ती प्रतिसाद निधीमधून मदत दिली जाते.वीज पडून जनावरांचा मृत्यू झाल्यास अल्प व अत्यल्पभूधारक आणि भूमिहीन पशुपालकांना शासनाच्या नियमांनुसार मदत मिळते.

यासाठी मृत जनावराचा तलाठी यांचा पंचनामा, पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांचे शवविच्छेदन अहवाल आणि इतर आवश्यक कागदपत्रे महसूल विभागाकडे जमा करावी लागतात.या सर्व उपायांचे पालन करून पशुपालक त्यांच्या पशुधनाचे वीजेच्या धोक्यापासून संरक्षण करू शकतात. त्यामुळे, सतर्क राहा आणि आपल्या जनावरांची काळजी घ्या!

**- संकलन :**
**विजय राऊत, सहा. संचालक (माहिती)**
**विभागीय माहिती कार्यालय, अमरावती**

## बी.बी.एफ. म्हणजे काय?

अवर्षणप्रवण भागात शेती करताना पाऊस वेळेवर आणि प्रमाणात होईल याची खात्री देता येत नाही. त्यामुळे अशा भागात जलसंधारण व पाणी ताण कमी करणाऱ्या तंत्रज्ञानाचा अवलंब अत्यावश्यक असतो. यासाठी बी.बी.एफ. म्हणजेच 'ड्ढ्रीरव इशव रपव त्र्रीींु' (रुंद वरंबा सरी) पद्धत ही शाश्वत उत्पादनाची दिशा दाखवते.

बी.बी.एफ. म्हणजे काय?

'बी.बी.एफ.' तंत्रज्ञान म्हणजे रुंद वरंबा आणि सरी पद्धतीने जमिनीची मशागत करून बियाण्याची पेरणी करणे. या पद्धतीत शेतात सुमारे ६० सें.मी. रुंद वरंबा आणि ३० सें.मी. सरी अशा रचनेने शेताची रचना केली जाते. ही रचना बी.बी.एफ. यंत्राच्या मदतीने तयार होते.

या तंत्रज्ञानाची वैशिष्ट्ये :

सोयाबीन, तूर, मुग, उडीद, कापूस, मका, हरभरा आदी पिकांसाठी उपयुक्त.

अवर्षणप्रवण क्षेत्रात प्रभावी उपयोग, कारण जलसंधारण सहज साधता येते.बियाणे, खते यांत २०-२५% बचत, त्यामुळे निविष्ठा खर्च कमी. २५ ते ३०% पर्यंत उत्पादनात वाढ.

तांत्रिक फायदे :

उताराच्या आडवी पेरणीमुळे जलसंधारण सुधारते, माती व पाणी दोन्ही साठते. पावसाचा खंड असला, तरी पाण्याच्या ताणाची तीव्रता कमी होते.जास्त पाऊस झाल्यास अतिरिक्त पाणी सऱ्यांमधून वाहून जाते, झाडांना पाणी साचत नाही.पिकाला भरपूर हवा आणि सूर्यप्रकाश मिळतो - रोपे जोमदार वाढतात.आंतरमशागत व फवारणी करणे सोपे - ट्रॅक्टर किंवा फवारणी यंत्र वापरता येते.मातीची धूप कमी होते आणि तिची भुसभुशीतता व सच्छिद्रता वाढते.

बी.बी.एफ. हे एक शाश्वत, खर्चिक बचत करणारे, उत्पादनवाढीस पोषक आणि पर्जन्याधारित शेतीस पूरक असे अत्यंत उपयुक्त तंत्रज्ञान आहे. योग्य नियोजनाने याचा अवलंब केल्यास शेतकरी बांधवांना हवामान बदलाशी सामना करत उत्तम उत्पादन घेता येईल.

**-जिल्हा माहिती कार्यालय, जळगाव**

# DDA कन्सल्टंट भरती

दिल्ली विकास प्राधिकरणमध्ये कन्सल्टन्ट पदासाठी भरती आयोजित करण्यात आली आहे. या भरती प्रक्रियेत उमेदवारांना उत्तम पगाराची नोकरी देण्यात येणार आहे.

दिल्ली विकास प्राधिकरण मध्ये कन्सल्टंट (लँडस्केप आर्किटेक्चर) पदासाठी भरती प्रक्रिया सुरू झाली असून इच्छुक आणि पात्र उमेदवारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. या भरती अंतर्गत एक वर्षासाठी कंत्राटी पद्धतीने नियुक्ती केली जाणार असून, आवश्यकतेनुसार आणि समाधानकारक कामगिरीनंतर कालावधी वाढवला जाऊ शकतो. अर्ज करण्याची अंतिम तारीख २७ मे २०२५ आहे आणि या तारखेनंतर आलेले अर्ज ग्राह्य धरले जाणार नाहीत.

उमेदवारांकडे आर्किटेक्चरमध्ये बॅचलर पदवी आणि लँडस्केप आर्किटेक्चरमध्ये मास्टर्स डिग्री किंवा समतुल्य पात्रता असणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे, मास्टर्सनंतर लँडस्केप प्रोजेक्ट्समध्ये व्यावसायिक अनुभव असावा. AutoC-D, -dobe Creative Suite, 3D Development Software, MS Office यांसारख्या सॉफ्टवेअर्सचे ज्ञान असणे देखील आवश्यक आहे. अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय २७ मे २०२५ रोजी ४५ वर्षांपेक्षा अधिक नसावे. वेतन उमेदवाराच्या अनुभवावर आधारित निश्चित करण्यात येणार आहे. ५ ते १० वर्षांचा अनुभव असलेल्या उमेदवारांना दरमहा ७६,००० आणि ३,००० प्रवास भत्ता मिळेल, तर ५ वर्षांपेक्षा कमी अनुभव असलेल्या उमेदवारांना दरमहा ५२,५०० आणि १,५०० प्रवास भत्ता दिला जाईल.

अर्ज करण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी सर्वप्रथम दिल्ली विकास प्राधिकरणाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.dda.gov.in) भेट द्यावी.

तेथे दिलेल्या भरतीविषयक सूचना व मार्गदर्शक तत्त्वांचे बारकाईने वाचन करून, त्यानुसार अर्ज डाउनलोड करावा. हा अर्ज पूर्णपणे भरून, आवश्यक ती माहिती नीट तपासून, स्कॅन करून तो consultant.rcdda.org.in या अधिकृत ई-मेल पत्त्यावर निर्धारित मुदतीच्या आत पाठवणे आवश्यक आहे.

अर्ज पाठवताना उमेदवारांना कोणतीही कागदपत्रे संलग्न करण्याची आवश्यकता नाही. तथापि, निवड प्रक्रिया दरम्यान, विशेषतः मुलाखतीच्या वेळी, सर्व मूळ शैक्षणिक व अनुभव प्रमाणपत्रे सादर करावी लागतील. अर्ज करताना कोणतीही माहिती चुकीची किंवा अपूर्ण असल्यास अर्ज फेटाळला जाऊ शकतो. त्यामुळे अर्ज व्यवस्थित भरून, वेळेत सादर करणे अत्यंत आवश्यक आहे. भरतीसंबंधी अधिक माहिती, बदल किंवा अपडेट्स जाणून घेण्यासाठी उमेदवारांनी DDA च्या अधिकृत संकेतस्थळाला नियमितपणे भेट देत राहावे.



# तुषार दोशी साताराचे नवीन पोलीस अधीक्षक



**समीर शेख यांची बृहन्मुंबईला उपायुक्तपदी बदली**

**प्रतापसिंहनगरमधील दत्ता जाधवच्या दहशतीचा बीमोड प्रतापगड येथील अफजलखान कबरीलगतची अतिक्रमणे हे टप्पे त्यांच्या कारकिर्दीत विशेष उल्लेखनीय ठरले. पुसेसावळी दंगल प्रकरणही त्यांनी अत्यंत संवेदनशीलपणे हाताळले होते.**

**आत्ताच एक्सप्रेस**

**सातारा /प्रतिनिधी/** साताऱ्याचे पोलीस अधीक्षक समीर शेख यांची बृहन्मुंबई येथे उपायुक्तपदी बदली झाली असून, तेथील उपायुक्त तुषार दोशी यांची साताऱ्याच्या पोलिस अधीक्षकपदी नेमणूक देण्यात आली आहे. गृह मंत्रालयाच्या वतीने गुरुवारी तेरा अधिकाऱ्यांच्या बदल्यांच्या आदेश जाहीर करण्यात आले. संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने पदस्थापनेचा कार्यभार स्वीकारण्यासाठी निर्देशित करण्यात आले आहे.

नूतन पोलीस अधीक्षक तुषार दोशी हे २००१ मध्ये ग्रॅज्युएशन पूर्ण झाल्यानंतर पोलीस दलात भरती झाले. तुषार दोषी यांनी फिजिक्स विषयात पदवी घेतली आहे. नाशिकमध्ये प्रशिक्षण घेतल्यानंतर तुषार दोशी यांची पहिली पोस्टिंग चंद्रपूरमध्ये करण्यात आली. राजुरा येथील उपविभागीय पोलीस अधिकारी म्हणून त्यांनी काम पाहिले. चंद्रपूर, गडचिरोली व राजुरा नक्षलींचा प्रभाव असलेल्या भागाचे त्यांनी काम पाहिले. त्यानंतर त्यांनी लातूर शहर, सोलापूर, पुणे, नवी मुंबई या शहरांमध्ये काम केले आहे.

तुषार दोशी हे पुणे पोलीस दलात सायबर विभागात उपायुक्त होते. २०१८ च्या सुमारास नवी मुंबईतील पोलीस उपायुक्तपदी कार्यरत असताना जोशी यांनी एजाज खान अटक प्रकरण अश्विनी बिद्रे गोरे हत्या प्रकरण अतिशय कुशलतेने हाताळले होते.

समीर शेख मुंबईचे पोलीस उपायुक्तपदी

प्रशिक्षणासाठी गेलेल्या समीर शेख यांची मुंबई येथे पोलीस उपायुक्तपदी वर्णी लागली आहे. ऑक्टोबर २०२२ मध्ये गडचिरोलीवरून समीर शेख यांची साताऱ्यात बदली झाली होती. त्यांनी येथे आपल्या कामाचा वेगळा ठसा उमटवला. आपल्या कारकिर्दीमध्ये ४० टोळ्यांमधील सुमारे १७६ जणांना त्यांनी मोक्का लावला. त्यांच्या कारकिर्दीतील पोलीस क्रीडा प्रबोधिनीने उत्तुंग यश मिळवले तर त्यांनी सुरू केलेली उंच भरारी योजना ही राज्यासाठी मार्गदर्शक ठरली.

प्रतापसिंहनगरमधील दत्ता जाधवच्या दहशतीचा बीमोड प्रतापगड येथील अफजलखान कबरीलगतची अतिक्रमणे हे टप्पे त्यांच्या कारकिर्दीत विशेष उल्लेखनीय ठरले. पुसेसावळी दंगल प्रकरणही त्यांनी अत्यंत संवेदनशीलपणे हाताळले होते. मात्र, त्यानंतर समीर शेख यांची अचानक बदली करण्यात आली होती. विधानसभा व लोकसभा निवडणुकां लक्षात घेऊन त्यांच्या बदलीला तात्पुरती स्थगिती मिळाली होती. तब्बल पावणेतीन वर्षाच्या कारकिर्दीमध्ये समीर शेख यांनी सातारा जिल्ह्यामध्ये कायदा व्यवस्था टिकवण्याचे काम चोखपणे केले.

# अहिल्यानगरचे नवे एसपी सोमनाथ घार्गे तर राकेश ओला यांची बृहन्मुंबईत उपायुक्त पदी नियुक्ती

**नौकरी एक्सप्रेस**

**अहिल्यानगर/ प्रतिनिधी/** जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी रायगड जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या नियुक्तीचे आदेश गुरुवारी राज्याच्या गृह विभागाकडून जारी करण्यात आले. सध्या अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक असलेले राकेश ओला यांना बृहन्मुंबई पोलीस उपायुक्त पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. सोमनाथ घार्गे यांनी यापूर्वीही अहिल्यानगर जिल्ह्यात कार्य केले आहे, त्यामुळे त्यांना जिल्ह्याची चांगली माहिती आहे, ज्यामुळे गुन्हेगारीवर प्रभावी नियंत्रण आणता येईल, अशी नगरकऱ्यांची अपेक्षा आहे. सोमनाथ घार्गे यांना आता अवैध धंदे, अंमली पदार्थांच्या वाहतुकीवर आळा घालण्याचे आव्हान आहे. शिवाय, येत्या जिल्हा परिषद, नगरपरिषद, नगरपालिका आणि महानगरपालिकेच्या निवडणुकांचा शांततापूर्ण आयोजन सुनिश्चित करणे हे देखील त्यांच्यासमोर महत्त्वाचे कार्य आहे. गृह विभागाकडून राज्यातील २२ आयपीएस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून त्यात अहिल्यानगरसह रायगड, लातूर, धाराशिव, ठाणे शहर, रत्नागिरी, सिंधुदुर्ग, पालघर, नाशिक ग्रामीण, बुलढाणा, सातारा, अकोले, कोल्हापूर आणि लोहमार्ग पोलीस तसेच राज्यातील मोठ्या शहरांतील उपायुक्त पदांवरील बदल्याही झाल्या आहेत. या बदल्यांमुळे राज्यातील पोलीस प्रशासनात नवीन ऊर्जा आणि कर्तव्यनिष्ठा येण्याची अपेक्षा आहे.

> **अहिल्यानगर जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षकपदी सोमनाथ घार्गे यांची नियुक्ती झाली असून, सध्या असलेल्या पोलीस अधीक्षक राकेश ओला यांची बृहन्मुंबई पोलीस उपायुक्तपदी बढती करण्यात आली आहे.**




राकेश ओला हे अहिल्यानगर जिल्ह्यात तसेच राज्यात एक कर्तव्यदक्ष आणि शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात. ते २०१२ च्या बॅचचे आयपीएस अधिकारी असून थेट सेवा भरतीने सहाय्यक पोलीस अधीक्षक पदावर रुजू झाले होते. त्यांची पहिली नियुक्ती २०१४ मध्ये अहिल्यानगरच्या श्रीरामपूर येथे झाली. येथे त्यांनी टोळी तसेच वाळू तस्करांवर धाडसी कारवाई केली. नंतर २०१६ मध्ये ते मालेगाव येथे अतिरिक्त पोलीस अधीक्षक, तर २०१७ मध्ये नागपूर येथे पोलीस उपायुक्त म्हणून कार्यरत राहिले. नागपूरमध्ये ते कुल ऑफिसर म्हणूनही परिचित झाले. त्यांनी नागपूर ग्रामीण अधीक्षक आणि लाचलुचपत प्रतिबंधक विभागाचे अधीक्षक म्हणूनही काम पाहिले. त्यानंतर त्यांना अहिल्यानगर जिल्हा पोलीस अधीक्षकपदी नियुक्त करण्यात आले होते.

# बेकायदा कृत्ये म्हणजे काय?

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** शहरी नक्षलवादाचा बीमोड करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या जनसुरक्षा विधेयकावर राज्यभरातून प्रश्नांची सरबत्ती सुरू आहे. बेकायदा कृत्ये म्हणजे काय, अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर विधेयकायाचा काय परिणाम होणार, असे प्रश्न उपस्थित करणाऱ्या सुमारे ११०० हरकती आणि सूचना प्राप्त झाल्या आहेत. पुढील महिन्यात होणाऱ्या पावसाळी अधिवेशनात हे विधेयक सभागृहात मांडण्याचा सरकारचा प्रयत्न आहे.

राज्य सरकारतर्फे जनसुरक्षा कायद्याचा मसुदा मार्च महिन्यात जनतेसमोर मांडण्यात आला. त्यावर सूचना व हरकतीही मागविण्यात आल्या होत्या. त्याला चांगला प्रतिसाद मिळाला असून नागरिक आणि विविध संघटनांनी ११०० च्या आसपास सूचना व हरकती नोंदविल्या आहेत. याविषयी मंत्रालयातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, प्राप्त झालेल्या सूचना व हरकती या बेकायदा कृत्ये या संज्ञेविषयीच अधिक असल्याचे स्पष्ट होत आहे. तसेच एकाच संस्था वा संघटनेकडून एकाच प्रकारचे आक्षेपही प्राप्त झालेल्या हरकती-सूचनांमध्ये आढळून आले आहेत. एकच मजकूर असलेल्या हरकती-सूचना एकत्र करून त्यांचे बुधवारी झालेल्या संयुक्त समितीच्या बैठकीत सादरीकरण करण्यात आल्याचे कळते. या बैठकीला उपस्थित संयुक्त समितीचे अध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी विधेयकातील आक्षेपांचे निराकरण करण्याची प्रक्रियाही सुरू राहणार असून सरकारने कुठेही ताठर भूमिका घेतली नसल्याचे स्पष्ट केले.

> **गैरसमजांविषयी स्पष्टीकरणाची प्रतीक्षाच**
>
> पत्रकारांच्या संघटनांनी या प्रस्तावित विधेयकाविरोधात नोंदविलेल्या आक्षेपांनंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ९ एप्रिल रोजी सरकारची भूमिका स्पष्ट केली होती. हे विधेयक व्यक्तींविरोधातील नव्हे तर संघटनांविरुद्ध असून अशा बेकायदा ठरविण्यात आलेल्या संघटनांमध्ये कार्यरत किंवा संबंध असलेल्या व्यक्तींवर कारवाई केली जाईल, असेही सांगितले होते. तसेच, विधेयकायविषयीचे गैरसमज दूर करण्यासाठी लेखी स्पष्टीकरण जारी करण्याचे आश्वासनही दिले होते. मात्र, ते अजूनही जारी करण्यात आलेले नाही.



जनता आणि संघटनांकडून आलेल्या सूचना आणि हरकतींचा मुद्दा मांडत विधेयकातील काही मुद्द्यांवर स्पष्टीकरण मिळावे, अशी मागणी संयुक्त समितीच्या बैठकीत विरोधकांनी केली. बैठकीआधी प्रस्तावित विधेयकामागची भूमिकेचे सादरीकरण करण्यात आले होते. यावर बोलताना तेलंगणा, आंध्र प्रदेश आणि ओदिशा या राज्यांनी अशाप्रकारचे विधेयक पारित केले असल्याचा दावा सरकारकडून केला जात आहे. तसेच, या कायद्यामुळे तेथील नक्षलवादी चळवळ निष्प्रभ झाल्याचे म्हटले जात आहे. पण या विधेयकामुळे तेथील शहरी नक्षलवादाचा कसा बीमोड झाला, राज्यातील कायदा हा तिथल्या कायद्यांशी तंतोतंत जुळणारा आहे का, याविषयी विस्तृत माहिती मिळावी, असेही विरोधकांनी सूचविले. ५ जून रोजी पुन्हा समितीची बैठक होणार असल्याचे समजते.

# इंजिनीअरिंग प्रवेशाला आता गती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** आता सीईटी कक्षाने पीसीएम गटासाठी हरकती व आक्षेप मागवले आहेत. विद्याथ्यांना परीक्षेदरम्यान विचारलेल्या कोणत्याही प्रश्नावर किंवा अधिकृत उत्तरतालिकेतील उत्तरावर आक्षेप असल्यास त्यांना ही संधी देण्यात येते. विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने आक्षेप नोंदवू शकतात. त्यासाठी प्रत्येक प्रश्नामागे एक हजार रुपये शुल्क भरावे लागते. हरकत योग्य असल्यास हे शुल्क परतही करण्यात येते...

ंदा शिक्षण क्षेत्रातील सर्वच महत्त्वाच्या परीक्षा आणि त्यांचे निकाल विक्रमी वेळेत लावण्याचा चंग बांधलेल्या राज्य सरकारने, आता अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी घेतलेल्या एमएचटी-सीईटीच्या निकालासाठीही कंबर कसली आहे. राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी कक्ष) अभियांत्रिकी प्रवेशासाठीच्या सीईटीवर (पीसीएम गट) काही हरकती किंवा आक्षेप असतील, तर ते नोंदवण्यासाठी अर्ज मागवले आहेत. हरकती व अर्ज नोंदवण्यासाठीची मुदत आज, गुरुवारपासून सुरू होणार असून उमेदवार शनिवारपर्यंत अर्ज नोंदवू शकतील.

अभियांत्रिकी, कृषी आणि औषधनिर्माणशास्त्र या अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी दरवर्षी पीसीएम आणि पीसीबी या दोन गटांमध्ये एमएचटी सीईटी परीक्षा होते. यंदा पहिल्या टप्प्यात पीसीबी गटाची परीक्षा कृषी व औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रमांसाठी ९ ते १७ एप्रिलदरम्यान पार पडली. या परीक्षेसाठी देशभरातून तीन लाख एक हजार ७२३ विद्यार्थ्यांनी अर्जनोंदणी केली. तर अभियांत्रिकी अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठी पीसीएम गटाची परीक्षा १९ ते २७ एप्रिल या दरम्यान झाली आणि यात चार लाख ६४ हजार २६३ विद्यार्थ्यांनी अर्जनोंदणी केली होती.यातील पीसीएम गटाच्या परीक्षेच्या शेवटच्या दिवशी, म्हणजेच २७ एप्रिल रोजी झालेल्या एका सत्रात जवळपास २५ प्रश्नांसाठी दिलेल्या उत्तरांचे पर्याय चुकीचे होते, असा आरोप विद्यार्थ्यांनी केला. त्यानंतर सीईटी कक्षाने ५ मे रोजी या सत्रातील विद्यार्थ्यांसाठी नव्याने परीक्षा घेतली. आता सीईटी कक्षाने दोन दिवसांपूर्वी, १९ मे रोजी पीसीएम गटाची उत्तरतालिका खुली केली होती. यातील उत्तरे पडताळून पाहण्यासाठी दोन दिवसांची संधी देण्यात आली होती. आता सीईटी कक्षाने पीसीएम गटासाठी हरकती व आक्षेप मागवले आहेत. विद्याथ्यांना परीक्षेदरम्यान विचारलेल्या कोणत्याही प्रश्नावर किंवा अधिकृत उत्तरतालिकेतील उत्तरावर आक्षेप असल्यास त्यांना ही संधी देण्यात येते. विद्यार्थी ऑनलाइन पद्धतीने आक्षेप नोंदवू शकतात. त्यासाठी प्रत्येक प्रश्नामागे एक हजार रुपये शुल्क भरावे लागते. हरकत योग्य असल्यास हे शुल्क परतही करण्यात येते.

**पुढील वृत्त पान नं.५ वर....पहा**

**महाराष्ट्र शासन**

## गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, छत्रपती संभाजीनगर

**जलसंपदा विभाग**

**(महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत उपक्रम)**

**कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर**

E-mail :- eemidlabadgmail.com    दूरध्वनी क्र. ०२४०-२३३४१७९

**ई - निविदा सूचना क्र- ०४ सन २०२५-२६ (ऑनलाईन)**

महारष्ट्र राज्याच्या राज्यपालांच्या वतीने कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १. छत्रपती संभाजीनगर. जलसंपदा विभाग, महाराष्ट्र शासन हे सक्षम निविदाकारांकडून खालील कामासाठी ई-निविदा प्रणालीद्वारे (ऑनलाईन) निविदा मागवीत आहेत. निविदा कागदपत्रे शासनाचे संकेतस्थळ https//mahatenders.gov.in येथून डाऊनलोड करण्यात यावीत. सविस्तर निविदा व ई - निविदेबाबत सर्व माहिती शासनाच्या संकेतस्थळावर व विभागीय कार्यालयाच्या सूचना फलकावर उपलब्ध आहे.

निविदा स्विकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांनी राखुन ठेवला आहे. अट असलेली निविदा स्विकारली जाणार नाही. निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास https//mahatenders.gov.in या संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

| | |
|---|---|
| १. कामाचे नांव व किंमत :- | वाकोद मध्यम प्रकल्पाच्या पुच्छ कालव्या लगत आवश्यक असलेल्या संरक्षक भिंतीचे (Gabion Structure) काम ता. फुलंब्री, जि. छत्रपती संभाजीनगर (रु. ७१.९२ लक्ष) जीएसटी वगळून ) |
| २. इसारा / बायना रक्कम :- | या कामांची संबंधीत माहिती महाटेंडर या संकेतस्थळावर सविस्तर निविदा सुचने (NIC) मध्ये देण्यात आलेली आहे. |
| ३. काम पुर्ण करण्याचा कालावधी | ६ महिने |
| ४. ई- निविदा संचाची किंमत- | रु.२०००/- + GST १८ % एकूण रु. २३६०/- |
| ५ कंत्राटदाराचा नोंदणी वर्ग :- | **निविदेतील अटी व शर्ती पूर्ण करु शकणारे सर्व पात्र कंत्राटदार** |

१. ई निविदा उपलब्ध कालावधी दि.२२/०५/२०२५ ते दि. २९/०५/२०२५
२. ई निविदा उघडणे दिनांक : ०२/०६/२०२५ रोजी शक्य असल्यास किंवा त्यापुढे
३. खालील संकेतस्थळावर ई निविदा बाबत सर्व माहिती उपलब्ध आहे. https://mahatenders.gov.in
४. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयातील सूचना फलक.
(सदर निविदा सुचनेमध्ये काही बदल होत असल्यास वरील वेब साईटवर कळविण्यात येईल.)

जा.क्र/लपावि-१/ लेखा - ३/३४००
लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर
यांचे कार्यालय.
दिनांक:- १६/०५/२०२५

**स्वाक्षरीत/-**
**(उमेश वानखेडे)**
**कार्यकारी अभियंता**
**लघु पाटबंधारे विभाग क्र. १, छत्रपती संभाजीनगर**

**संमा/छत्रपती संभाजीनगर / जाहिरात/ ४९/२०२५-२६**

# प्रवेशाच्या पहिल्याच दिवशी वेबसाईट ठप्प

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई / प्रतिनिधी/** अकरावी प्रवेशाच्या प्रत्यक्ष अर्ज भरण्याच्या प्रक्रियेला बुधवारी सकाळी सुरुवात झाली. परंतु, बुधवारी संकेतस्थळच बंद असल्याने विद्यार्थ्यांना अर्ज भरता आले नाही. त्यामुळे विद्यार्थी व पालकांना मानसिक त्रास सहन करावा लागला. दहावीचा निकाल १३ मे रोजी जाहीर झाल्यानंतर शिक्षण संचालनालयाने तातडीने ऑनलाईन अकरावी प्रवेश परीक्षा सुरू केली.

> **विद्यार्थ्यांसह पालकही चिंतेत**

१९ व २० मे रोजी विद्यार्थ्यांना सराव करण्यासाठी संकेतस्थळावर सुविधा उपलब्ध करण्यात आल्यानंतर २१ मेपासून प्रत्यक्ष ऑनलाईन प्रवेश अर्ज भरण्यास सुरुवात करण्यात आली. मात्र, अकरावी प्रवेशाचे संकेतस्थळ बुधवारी सकाळपासूनच बंद असल्याने विद्यार्थी व पालकांना अर्ज भरण्यात अडचणींचा सामना करावा लागला. सकाळपासून सायबर कॅफे किंवा घरातील संगणकासमोर बसलेल्या विद्यार्थ्यांना मानसिक त्रासाला सामोरे जावे लागले. संकेतस्थळावर देण्यात आलेल्या हेल्पलाईन क्रमांकावर पालक व विद्यार्थ्यांनी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता त्यांना कोणतेही उत्तर मिळाले नाही.

दरम्यान, मुंबई, पुणे-पिपरी चिंचवड महापालिका, छत्रपती संभाजीनगर महापालिका, नाशिक महापालिका येथे ठराविक महानगरपालिकांमध्ये ऑनलाईन पद्धतीने प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येत होती. या प्रवेश प्रक्रियेदरम्यान शिक्षण संचालनालयाचा प्रवेश प्रक्रियेत दरवर्षी गोंधळ उडत असे. त्यामुळे राज्यभरातील प्रवेश प्रक्रिया सुरळीत पार पडण्याबाबत शिक्षण तज्ज्ञांकडून शंका उपस्थित करण्यात येत होती.

पहिल्याच दिवशी रास्त ठरविण्यात आली. अकरावी प्रवेशाचे वेबपोर्टल मोबाईलद्वारे हाताळताना अधिक सुलभ व्हावे, यासाठी काही वेळासाठी पोर्टलची सुविधा बंद ठेवण्यात आली आहे. विद्यार्थी आणि पालकांनी गोंधळून जाऊ नये. संकेतस्थळ सुरू झाल्यानंतर प्रवेश प्रक्रियेच्या अपडेट देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या व्हॉट्सअप चॅनेलवर आपल्याला लगेच माहिती देण्यात येईल. विद्यार्थी नोंदणी आणि पसंतीक्रम भरण्याची सुविधा पहिल्या फेरीसाठी २८ मेपर्यंत सुरू राहणार असल्याचे शिक्षण संचालनालयाकडून स्पष्ट केले आहे

# मराठी : संकीर्ण परिक्षाभिमुख सराव प्रश्न

**प्र.१-'जगी सर्वसुखी असा कोण आहे?' या प्रशनार्थी वाक्याचे विधानार्थी रूपांतर करा.**
(१) जगी सर्वसुखी असा कोण आहे. (२) जगी सर्वसुखी कोणीतरी असेलच
(३) जगी सर्वसुखी असा कोणीही नाही (४)यापैकी नाही

**प्र.२-'श्रीमंत माणसांना गर्व असतो.' या वाक्यात 'श्रीमंत' हे ........... आहे.**
(१)नाम (२)सर्वनाम (३)विशेषण (४)सामान्य नाम

**प्र.३-'श्रीमंतांना गर्व असतो' या वाक्यात श्रीमंतांना हे ........... आहे.**
(१)नाम (२)सर्वनाम (३) विशेषण (४)क्रियाविशेषण

**प्र.४-मी आजारी आहे. मी शाळेत जाणार नाही. या दोन वाक्यांपासून एकच केवल वाक्य तयार करा ?**
(१)मी शाळेत जाणार नाही कारण मी आजारी आहे.
(२)मी आजारी असल्यामुळे शाळेत जाणार नाही.
(३)मी आजारी आहे म्हणून मी शाळेत जाणार नाही.
(४)मी शाळेम गेलो असतो, परंतु मी आजारी आहे

**प्र.५-'जाईचा अर्ज स्वीकारण्यात आला नाही.' या नकारार्थी वाक्याचे होकारार्थी वाक्यात रूपांतर करा.**
(१) जाईचा अर्ज स्वीकारण्यात आला.
(२) जाईचा अर्ज स्वीकारण्यात येईल.
(३) जाईचा अर्ज फेटाळण्यात येईल.
(४)यापैकी नाही.

**प्र.६-'पाचशे रूपये ही काही लहान रक्कम नव्हे.' या नकारार्थी वाक्याचे होकारार्थी वाक्यात रूपांतर करा. ?**
(१)पाचशे रूपये देखील ही मोठी रक्कम आहे.
(२) पाचशे रूपये ही लहान रक्कम आहे.
(३)पाचशे रूपये ही लहान रक्कम नाही का?
(४)यापैकी नाही.

**खाली प्रश्न क्र.७ ते १२ मध्ये रिकाम्या जागी योग्य शब्द निवडा.**

**प्र.७-पाडव्यानिमित्त आज आम्ही ........... खाल्ले.**
(१)गोडबीड (२)गोडसर (३)गोडधोड (४)गोडगुळमट

**प्र.८-गेले चार दिवस पावसाने जोरदार ........... दिला.**
(१)तडाखा (२)दणका (३)कडाका (४)यापैकी सर्व

**प्र.९-या हुकुममाची ........... झालीच पाहिजे. ?**
(१)तामिल (२)बडदास्त (३)अंमलबजावणी (४)सरबराई

**प्र.१०-आममचा बाळ ............. बालक स्पर्धेत पहिला आला. ?**
(१)गोंडस (२)बाळसेदार (३)चुणचुणीत (४)सुदृढ

**प्र.११-महामार्ग बांधतांना त्यांच्या बाजूला...... देखील हवेत.**
(१)हमरस्ते (२)सेवारस्ते (३)आडमार्ग (४)राजमार्ग

**प्र.१२-मराठी वर्णमाला एकूण ............... वर्णांची बनेलेली आहे. ?**
(१)२६ (२)४८ (३)५२ (४)५६

**प्र.१३-'क्ष' हे संयुक्त व्यंजन खालीलपैकी कशाप्रकारे लिहिता येईल?**
(१)क् + स्+अ (२)क् + श् + अ
(३)क् + श् + अ (४)क्ष् + अ

**प्र.१४- 'क्ष' हे संयुक्त व्यंजन खालीलपैकी कशाप्रकारे लिहिता येईल??**
(१)ज्ञ् + अ (२)द् + न् + य् + अ
(३)द्+ न् + अ (४) द् + न्यू

**प्र.१५- मराठी वर्णमालेत एकूण ........... स्वर आहेत?**
(१)२ (२)१० (३)१२ (४)१६

**प्र.१६- मराठी वर्णमालेत एकूण ........... स्वरादी आहेत??**
(१)२ (२)१० (३)१२ (४)१६

**प्र.१७- इंग्रजांच्या मराठीवरील प्रभावामुळे ममराठी भाषेत इंग्रजीतून आलेले नवींन स्वरादी कोणते?**
(१)अॅ, ऑ (२)बॅ, कॅ (३)अै,ओ (४)आाा, औ

**प्र.१८-ज्याला मुळीच लिहिता व वाचता येत नाही अशी व्यक्ती म्हणजे..........**
(१)साक्षर (२)अक्षर (३)नवसाक्षर (४)निरक्षर

**प्र.१९-एकाच आईच्या पोटी जन्म घेतलेल्या बंधूंना ....... म्हणतात.**
(१)अनुजउ(२)अग्रज (३)सहोदर (४)अनुग्रज

**प्र.२०-प्राचीन रुढीपरंपरा व चालीरीतींना अनुसरून वागणारी व्यक्ती म्हणजे.............**
(१)सनातानी (२)सुधारक (३)सुधाकर (४)अनुयायी

**प्र.२१-मराठी वर्णमालेत............ ही दोन संयुक्त व्यंजने आहेत.**
(१)ह, ळ् (२)क्ष्, ज्ञ् (३)त्र, ङ (४)ह, ह्र

**प्र.२२-मही + ईश या पोटशब्दांपासून बनणारा जोडशब्द ओळखा.**
(१)महेश (२)महाईश (३)मिहिश (४)महीश

**प्र.२३-एक + एक या संधीविग्रहापासून बनणारा जोडशब्द ओळखा.**
(१)एकेक (२)एकैक (३)एकएक (४)यापैकी नाही

**प्र.२४-सदाचार या शब्दाचा योग्य संधीविग्रह ओळखा.**
(१)सद् + आचार (२)सदा + आचार
(३)सत् + आचार (४)सद् + आचार

**प्र.२५-वाक् + निश्चय या संधीग्रहापासून बनणारा जोडशब्द ओळखा.**
(१)वाकनिश्चय (२)वाङ्ःनिश्चय
(३)वांगनिश्चय (४)यापैकी नाही

**प्र.२६-निष्कारण या शब्दाचा संधीविग्रह ओळखा. ?**
(१)निश + कारण (२)निष + कारण
(३)निः + कारण (४)नि + कारण

**प्र.२७-पुर्नजन्म या शब्दाचा संधीविग्रह ओळखा. ?**
(१)पुनर् + जन्म (२)पून + र्जन्म
(३)पुनः + जन्म (४)पुन्हा + जन्म

**प्र.२८-'त्याचे अक्षर अतिशय सुंदर आहे.' या विधानार्थी वाक्याचे उद्गार्थी वाक्यात रूपांतर करा.**
(१)वा! काय सुंदर अक्षर आहे त्याचे !
(२)काहीतरीच अक्षर आहे त्याचे.
(३)अतिशय सुंदर अक्षर आहे त्याचे!
(४)यापैकी नाही

**प्र.२९-खाली दिलेल्यापैकी मराठीतील योग्य संधी ओळखा.**
(१)काही + असा = काहीसा (२)नदी + आत = नदीत
(३)घाम + ओळे =घामोळे (४)सर्व पर्याय बरोबर

**प्र.३०-प्रत्यक्ष अथवा काल्पनिक वस्तू किंवा त्यांच्या गुधर्मांना दिलेले नाव म्हणजे ..........**
(१)नाम (२)सर्वनाम (३)विशेषण (४)क्रियाविशेषण

**प्र.३१-विद्यार्थी अभ्यास करतात. या वाक्यात विद्यार्थी हे ......... आहे.**
(१)सामान्य नाम (२)विशेष नाम
(३)भाववाचक नाम (४)यापैकी नाही

**प्र.३२-'गंगा' ही पवित्र नदी आहे. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)सामान्य नाम (२)विशेष नाम
(३)भाववाचक नाम (४)यापैकी नाही

**प्र.३३-तुमचा मुलगा 'कुभकर्णच' दिसतो. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)सामान्य नाम (२)विशेष नाम
(३)भाववाचक नाम (४)यापैकी नाही

**प्र.३४-'दया' ही माझी बहिणीची मुलगी आहे. (ठळक शब्द-ाची जात ओळखा)**
(१)सामान्य नाम (२)विशेष नाम
(३)भाववाचक नाम (४)यापैकी नाही

**प्र.३५-या गावात बरेच नारद आहेत. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)सामान्य नाम (२)विशेष नाम
(३)भाववाचक नाम (४)यापैकी नाही

**प्र.३६-विदुषी या शब्दांचे पुल्लिंगी रूप ओळखा.**
(१)विदुषक (२)विदुष (३)विद्वान (४)यापैकी नाही

**प्र.३७-खोंड या शब्दांचे स्त्रींलिंगी रूप ओळखा.?**
(१)खोंडी (२)खोंडण (३)कालवड (४)भाटी

**प्र.३८-उंदीर या शब्दाचे अनेकवचन रुप ओळखा.**
(१)उंदीर (२)उंदरे (३)उंदिरे (४)यापैकी नाही

**प्र.३९-भाषा या शब्दाचे अनेकवचनी रुप ओळखा.**
(१)भाष्य (२)भाषिक (३)भाषा (४)यापैकी नाही

**प्र.४०-वाक्यात नामाऐवजी येणारा शब्द म्हणजे ..........**
(१)विशेषण (२)सर्वनाम (३)विशेष नाम (४)सामान्य नाम

**प्र.४१-नामाबद्दल विशेष माहिती सांगून त्याची व्याप्ती मर्यादित करणारा शब्द म्हणजे........**
(१)सर्वनाम (२) विशेषण (३)क्रियापद (४) यापैकी नाही

**प्र.४२-मला सातारी पेढे आवडतात. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)विशेष नाम (२)नाम (३)विशेषण (४)क्रियाविशेषण

**प्र.४३- वरच्या मजल्यावर पाटील राहतात. (ठळक शब्दाची जात ओळखा) ?**
(१)विशेषण (२)नाम (३)सर्वनाम (४)क्रियाविशेषण

**प्र.४४-ऐहिक या शब्दाच्या विरुध्दार्थी शब्द कोणता?**
(१)पारलौकिक (२)पारमार्थिक (३)दृष्टान्तिक (४)नौहिक

**प्र.४५- ऐच्छिक या शब्दाच्या विरुध्दार्थी शब्द कोणता?**
(१)इच्छिक (२)इच्छित (३)अपरिहार्य (४)परिहाय

**प्र.४६-पुरोगामी या शब्दाच्या विरुद्धार्थी शब्द कोणता?**
(१)अर्वाचीन (२)प्रतिगामी (३)पुढारी (४)प्राचीन

**प्र.४७-समुद्र, या शब्दाशी समानार्थी नसलेला शब्द कोणता?**
(१)समीकरण (२)अर्णव (३)रत्नाकर (४)सिंधू

**प्र.४८-इंदू, सुधाकर, शशी, हिमांशू ही सर्व कोणाची नावे आ-हेत?**
(१)चंद्र (२)सूर्य (३)पृथ्वी (४)सागर

**प्र.४९-वीज या शब्दाशी समानार्थी नसलेला शब्द ओळखा.**
(१)चपला (२)तडित (३)सैदामिनी (४)अचला

**प्र.५०-मोठ्या माणसाच्या अंगीदेखील दोष असतात या अर्थाची म्हण ओळखा.**
(१)बडा घर पोकळ वासा (२)दिव्याखाली अंधार
(३)नावडतीचे मीठ अळणी (४)बळी तो कान पिळी

**प्र.५१-'नाव सूनबाई हाथी कथिलाचा वाळा' या म्हणीशी साधर्म्य असलेली म्हण ओळखा.**
(१)नाव मोठे लक्षण खोटे
(२)अगं अगं म्हशी, मला कुठे नेशी
(३)वासरात लंगडी गाय शहाणी
(४)सुसरहणबाई तुझी पाठ मऊ

**प्र.५२-प्रयत्ने ....... कण रगडिता तेलही गळे ?**
(१)तीळाचे (२)ववाळूचे (३)काजूचे (४)बदामाचे

**प्र.५३-स्वतःच्याच नात्यातील माणूस आपल्या बिनाशास कारणीभूत ठरतो या आशयाची म्हण कोणती?**
(१)कामापुरता मामा (२)सारा गाव मामाचा एक नाही कामाचा
(३)कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ (४)मन चिंती ते वैरी चिंती

**प्र.५४-ज्याच्यापसून आपला फायदा आहे , त्या व्यक्तिचा थोडा त्रासदेखील सुखद वाटतो या आशयाची म्हण कोणती?**
(१)दुभत्या गायीच्या लाथा गोड
(२)मेलेल्या म्हशीला मणभर दूध
(३)भरवशाच्या म्हशीला टोणगा
(४)नावडतीचे मीठ आळणी

**प्र.५५-सोन्यानाण्याचा मोह कुणालाच टाळता येत नाही या आशयाची म्हण ओळखा.**
(१)नाव सूनबाई हाथी कथीलाचा वाळा
(२)दुभत्या गायीच्या लाथा गोड
(३)दाखविलं सोनं हसे मूल तान्हं
(४)दाम करी त्याला बिबी करी सलाम

**प्र.५६-क्रीडांगण या शब्दाचा समास ओळखा.**
(१)अव्ययीभाव (२)तत्पुरुष (३)व्दिगू (४)बहुव्रिही

**प्र.५७-गजाचे आहे आनन ज्याला असा तो (गजानन). येथे कोणता समास ओढळतो.**
(१) अव्ययीभाव (२) तत्पुरुष (३)व्दंव्द (४)बहुव्रिही

**प्र.५८- खालीलपैकी केणते व्दंव्द समासाचे उदाहरण आहे?**
(१)विटीदांडू (२)रामलक्ष्मण (३)एकवीस (४)राजपूत्र

**प्र.५९- खालीलपैकी केणते व्दंव्द समासाचे उदाहरण नाही?**
(१)दररोज
(२)गावोगाव
(३)रात्रंदिवस
(४)वनभोजन

**प्र.६०-रामाने रावणास मारले. या वाक्यातील प्रयोग ओळखा.**
(१)कर्तरी (२)कर्मणि (३)भाव (४)यापैकी नाही

**प्र.६१-राम आंबा खातो. या वाक्यतील प्रयोग ओळखा.**
(१)कर्तरी (२)कर्मणि (३)भावे (४)यापैकी नाही

**प्र.६२-शिपायाकडून चोर पकडला गेला. या वाक्यातील प्रयोग ओळखा.**
(१)कर्तरी (२)कर्मणि (३)भावे (४)यापैकी नाही

**प्र.६३-राजाला मुकुट शोभतो. या वाक्यातील कर्ता ओळखा.**
(१)राजा (२)मुकुट (३)शोभतो (४)यापैकी नाही

**प्र.६४-मला आज थंडी वाजतं. या वाक्यातील कर्ता ओळखा.**
(१)मला (२)आल (३)थंडी (४)वाजते

**प्र.६५-मला लतादिदिंचे गाणे आवडते. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)विशेषण (२)क्रियाविशेषण (३)क्रियापद (४)अव्यय

**प्र.६६-वाक्याचा अर्थ पूर्ण करणारा व क्रिया दर्शविणारा शब्द म्हणजे............**
(१)क्रिया विशेषण (२)क्रियापद
(३)क्रियाविशेषण अव्यय (४)यापैकी नाही

**प्र.६७-खालीलपैकी कालदर्शक क्रियाविशेषण अव्यय कोणते?**
(१)उद्या (२)नेहमी (३)दररोज (४)वारंवार

**प्र.६८-राम जलद धोवतो. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)विशेषण (२)क्रियापद
(३)क्रियाविशेषण (४)क्रियाविशेषण अव्यय

**प्र.६९-मराठी व्याकरणात शब्दाच्या एकूण ........... जाती मानल्या मानल्या गेल्या आहेत.**
(१)४ (२)८ (३)१० (४)१२

**प्र.७०-ती काय माती गाते ! (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)नाम (२)सामान्य नाम
(३)विशेषण (४)क्रियाविशेषण अव्यय

**प्र.७१-घर पहावे बांधून आणि .......... (म्हण पूर्ण करा.)**
(१)विहीर पहावी खणून (२)स्वर्ग पहावा मरून
(३)लग्न पहावे करून (४)खुशाल द्यावे ताणून

**प्र.७२-सूताने स्वर्ग गाठणे म्हणजे ..........**
(१)स्वर्गापर्यंत सुत कातण
(२)केवळ तर्कावरून संपूर्णअंदाज बांधण
(३)मरतांना सुत घेऊन जाणे
(४)यापैकी नाही

**प्र.७३- 'ओनामा' या शब्दाचा समानार्थी शब्द कोणता?**
(१)प्रारंभ (२)हाक (३)संबोधन (४)प्रत्यंतर

**प्र.७४-ते दृश्श अतिशय ........... होते(रिकाम्या जागी येग्य वापरा)**
(१)लोभस (२)गोंडस (३)सुंदर (४)विलोभनीय

**प्र.७५- स्वतः काहीही काम न करता इतरांना मुर्खपणाचा सल्ला देणाऱ्यास काय म्हणावे ?**
(१)घागरगडचा सुभेदार (२)उंटावरचा शहाणा
(३)कळीचा नारळ (४)झाकले माणिक

**प्र.७६-'झाकले माणिक' म्हणजे .........**
(१)दुष्ट मनुष्य (२)साधा व गुणी मनुष्य
(३)अर्धवट शहाणा (४)यापैकी नाही

**प्र.७७-हातावर तुरी देणे.या वाक्प्रचाराचा अर्थ कोणता?**
(१)लाच देणे (२)चीरीमीरी देणे
(३)फसवूण जाणे (४)खूप मार देणे

**प्र.७८-षट्कर्णी होणे. या वाक्प्रचाराचा अर्थ कोणता?**
(१)मुंज होणे (२)विवाह होणे
(३)गुप्त गोष्ट इतरांना समजणे (४)गुप्तरित्या पलायण करणे

**प्र.७९-बुडत्याचा पाय.......... (म्हण पूर्ण करा.)**
(१)चिखलात (२)गाळात (३)बुटात (४)खोलात

**प्र.८०-तिन्ही बाजूंनी पाणी असलेला प्रदेश म्हणजे..........**
(१)बेट (२)दुआब (३)व्दीपकल्प (४)सामुद्रधुनी

**प्र.८१-टाकसाळ म्हणजे ...........**
(१)नाणी बनविण्याचा कारखाना (२)कचरा टाकण्याची जागा
(३)तांदळाची एक जात (४)पेन बनविण्याचा कारखाना

**प्र.८२-कृपण या शब्दाचा विरूध्दार्थी शब्द कोणता?**
(१)कंजूस (२)उदार (३)कफन (४)वस्त्र

**प्र.८३-अंबर या शब्दाचे समानार्थी शब्द कोणते?**
(१)आकाश,कमळ (२)आकाश,वस्त्र
(३)आकाश,अंबारी (४)यापैकी नाही

**प्र.८४-सुसंगतीत सदा घडो, सुजनक्य कानी पडो ! या पंक्तीमधील अलंकार ओळखा.**
(१)अनुप्रास (२)श्लेष (३)अन्योक्ती (४)यमक

**प्र.८५-कुटुंबवत्सल इथे फणस हा ! कटिखांद्यावर घेऊनि बाळे. या पंक्तीमधील अलंकार ओळखा.**
(१)चेतनगुणोक्ती (२)अन्योक्ती (३)अनुप्रास (४)श्लेष

**प्र.८६-आम्ही जातो आमुच्या गावा. या वाक्याचा प्रकार ओळखा.**
(१)केवलवाक्य (२)मिवाक्य (३)संयुक्तवाक्य (४)यापैकी नाही

**प्र.८७-मुलांनी चांगला अभयास करावा. या वाक्याचे आज्ञार्थी वाक्य करा?**
(१)मुले चांगला अभ्यास करतात.
(२)मुलांनी चांगला अभ्यास करायला नको का?
(३)मुलांनो, चांगला अभ्यास करा.
(४)यापैकी नाही

**प्र.८८-मुलांनो,गुरूजींची आज्ञा पाळा. या वाक्याचे विद्यार्थी वाक्य बनवा.**
(१)मुले,गुरूजींची आज्ञा पाळतात.
(२)मुलांनी गुरूजींची आज्ञा पाळावी.
(३)मुले गुरूजींची आज्ञ पाळतील.
(४)मुले गुरूजींची आज्ञा पाळतात.

**प्र.८९-तुमचा मुलगा आज चांगला खेळला. या वाक्यातील विधेय कोणते?**
(१)तुमचा (२)मुलगा (३)चांगला (४)खेळला

**प्र.९०-पांढरे स्वच्छ दात मुखास शोभा देतात. या वाक्यातील उद्श्य् कोणते?**
(१)पांढरे स्वच्छ (२)दात (३)मुखास (४)शोभा

**प्र.९१- बिचारा! फार वाईट झालं त्याचं. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)विशेषण (२)क्रियाविशेषण अव्यय
(३)केवलप्रयोगी अव्यव (४)यापैकी नाही

**प्र.९२-दार उघडले आणि मुले आत आली. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१) क्रियाविशेषण अव्यय (२)शब्दयोगी अव्यय
(३)उभयान्वयी अव्यय (४)यापैकी नाही

**प्र.९३-मरावे परि किर्ती रूपे उरावे. (ठळक शब्दाची जात ओळखा)**
(१)उभयान्वयी अव्यय (२)शब्दयोगी अव्यय
(३)क्रियाविशेषण अव्यय (४)क्रियापद

**प्र.९४-पक्षी झाडावर बसले आह.(ठळक शब्दाची जात ओळ-खा)**
(१) शब्दयोगी अव्यय (२) क्रियाविशेषण अव्यय
(३) उभयान्वयी अव्यय (४)यापैकी नाही

**प्र.९५- मी निबंध लिहीत असतो. या वाक्यातील काळ ओळ-खा.**
(१)साधा वर्तमानकाळ (२)साधा भूतकाळ
(३)रिती वर्तमानकाळ (४)भविष्यकाळ

**प्र.९६-मी पत्र वाचत असेल. या वाक्यातील काळ ओळखा.**
(१)साधा भविष्यकाळ (२)अपूर्ण भविष्यकाळ
(३)पूर्ण भविष्यकाळ (४) रिती भविष्यकाळ

**प्र.९७-आकाश जिथे जमिनीला टेकल्यासारखे भासते ती जागा ...........**
(१)संगम (२)सीमा (३)क्षितीज (४)अतिश

**प्र.९८-खालीलपैकी व्याकरणदृष्ट्या शुध्द शब्द ओळखा.**
(१)कोट्याधीश (२)कोट्यधीश
(३)कोट्याधिश (४)कोट्ट्याधीश

**प्र.९९- खालीलपैकी व्याकरणदृष्ट्या शुध्द शब्द ओळखा.**
(१)आशीर्वाद (२)अशीर्वाद (३)अर्शिवाद (४)आशिर्वाद

**प्र.१००-खालीलपैकी अयोग्य जोडशब्द ओळखा.**
(१)न्यायनिवाडा (२)पूजाबिजा (३)केरकचरा (४)गोडीगुलाबी

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) ३ (२) ३ (३) १ (४) २ (५) ३ (६) १ (७) ३ (८) १ (९) ३ (१०) ४ (११) २ (१२) २ (१३) ३ (१४) २ (१५) ३ (१६) १ (१७) १ (१८) ४ (१९) ३ (२०) १ (२१) २ (२२) ४ (२३) २ (२४) ३ (२५) २ (२६) ३ (२७) १ (२८) १ (२९) ४ (३०) १ (३१) १ (३२) २ (३३) १ (३४) २ (३५) १ (३६) ३ (३७) ३ (३८) १ (३९) ३ (४०) २ (४१) २ (४२) ३ (४३) १ (४४) १ (४५) ३ (४६) २ (४७) १ (४८) १ (४९) ४ (५०) २ (५१) १ (५२) २ (५३) ३ (५४) १ (५५) ३ (५६) २ (५७) ४ (५८) ४ (५९) ४ (६०) ३ (६१) १ (६२) २ (६३) २ (६४) ३ (६५) ३ (६६) २ (६७) १ (६८) ४ (६९) २ (७०) ४ (७१) ३ (७२) २ (७३) १ (७४) ४ (७५) २ (७६) २ (७७) ३ (७८) ३ (७९) ४ (८०) ३ (८१) १ (८२) २ (८३) २ (८४) ४ (८५) १ (८६) १ (८७) ३ (८८) २ (८९) ४ (९०) २ (९१) ३ (९२) ३ (९३) १ (९४) १ (९५) ३ (९६) २ (९७) ३ (९८) २ (९९) १ (१००) २

## इंजिनीअरिंग प्रवेशाला

पान ४ वरून...

विद्यार्थ्यांना ही संधी 'ऑब्जेक्शन ट्रॅकिंग' या पर्यायाने लॉग-इनमध्ये उपलब्ध करून दिली आहे. काही वेळा प्रश्न चुकीचे मांडलेले असतात, तर कधी उत्तरांचे पर्याय अस्पष्ट असतात. अनेकदा उत्तरतालिकेतील उत्तरावर विद्यार्थ्यांना आक्षेप असू शकतो. अशा वेळी विद्यार्थ्यांना स्वतःचा अभ्यास आणि परीक्षेतील अनुभव गृहीत धरून हरकत मांडण्याचा हक्क असतो. विद्यार्थी त्यांच्या हरकती किंवा आक्षेप आज, २२ मेपासून शनिवारी २४ मे पर्यंत नोंदवू शकणार आहेत. त्यामुळे कोणताही विलंब न करता विद्यार्थ्यांनी आपल्या हरकती वेळेवर सादर कराव्या, असे आवाहन सीईटी कक्षाने केले आहे.

निकाल जूनच्या पहिल्या आठवड्यात -

हरकती व आक्षेप सादर झाल्यानंतर सीईटी कक्षाद्वारे त्यांची तपासणी होणार आहे. या हरकतींमध्ये तथ्य आढळल्यास त्याची योग्य दखलही घेतली जाते. त्यानंतर सीईटी कक्षाकडून एमएचटी सीईटीचा निकाल जाहीर केला जाणार आहे. हा निकाल जून महिन्याच्या पहिल्या आठवड्यात जाहीर होण्याची शक्यता आहे.

# सोलापूर ग्रामीण जिल्हा सशस्त्र पोलिस शिपाई भरती - २०१७

**प्र.१– एका मुलाने ३२५ मध्ये ४९ मिळण्याऐवजी त्यामधून वजा केले, तर त्याच्या उत्तरात किती फरक पडेल?**
(अ)९८ (ब)१०४ (क)९६ (ड)यापैकी नाही

**प्र.२– ०.२५ X 2.5 X 1.2=?**
(अ)०.७५ (ब)७.५ (क)७५ (ड)७५००

**प्र.३–३,२४,००० रुपयास घेतलेले घर विकल्यामुळे शेकडा ५ तोटा झाला, तर घर किती रुपयांस विकले असावे?**
(अ)३,०४,८०० (ब)३,०७,८०० (क)३,२०,८०० (ड)३,२२,८००

**प्र.४–द.सा.द.शे. १५ दराने ४५० रुपयांचे ४ वर्षांचे सरळ व्याज किती?**
(अ)२३० रुपये (ब)२४० रुपये (क)२६० रुपये (ड)२७० रुपये

**प्र.५–२ माणसे एक काम ६ दिवसात करतात, तर तेच काम ४ माणसे किती दिवसात करतील?**
(अ)३ दिवस (ब)४ दिवस (क)२ दिवस (ड)५ दिवस

**प्र.६– १५ मिलीमीटर + ६५ सेंटीमीटर = ?**
(अ)६.६५ मीटर (ब)७.६५ मीटर (क)०.६६५ मीटर (ड)६६.५ मीटर

**प्र.७– १८ + ५ X 6 - 3 X 7 - 7?**
(अ)४५ (ब)४८ (क)२० (ड)९३८

**प्र.८– एका सेंकदात १५ मीटर जाणाऱ्या गाडीचा ताशी वेग किती कि.मी.?**
(अ)४५ (ब)४८ (क)५४ (ड)६०

**प्र.९–फॉस्फरसचे रासायनिक गुणसुत्र खालीलपैकी कोणते?**
(अ)H2MgO4 (ब)H2CO4 (क)H2SO4 (ड) H2PO4

**प्र.१०–खालीलपैकी कोणते तत्व वनस्तींसाठी सक्ष्मपोषक नाही?**
(अ)लोह (ब)मॅग्नेशियम (क)मॉलिब्डेनम (ड)मँगनीज

**प्र.११– भुमिगत पाणी प्रदुषित करणारे अजैविक प्रदंषिक आहे?**
(अ)बॅक्टेरीया (ब)शैवाल (क)अर्सेनिक (ड)विषाणु

**प्र.१२–अवरक्त किरणांचा स्त्रोत आहे?**
(अ)मिट्टी तेल (ब)विद्युत बल्ब (क)नर्नस्ट ग्लोवर (ड)प्रतिदिप्त नलिका

**प्र.१३– हिरा चमकदार दिसतो कारण–**
(अ)परावर्तन (ब)अपवर्तन (क)पूर्ण आंतरिक परावर्तन (ड)प्रकिर्णन

**प्र.१४–'अनुस्वार' व 'विसर्ग' यांना काय म्हणतात?**
(अ)स्ववर (ब)व्यंजन (क)स्वरादी (ड)संयुक्त स्वर

**प्र.१५–संधी करा – षट् + मास ?**
(अ)षःमास (ब)षण्मास (क)षटमास (ड)षन्मास

**प्र.१६–भाववाचक नाम ओळखा.**
(अ)भास्कर (ब)आपण (क)सुंदर (ड)सौंदर्य

**प्र.१७–शब्दाचा प्रकार (शब्दजाती) ओळखा.'पर्वत'**
(अ)विशेष नाम (ब)भाववाचक नाम (क)सामान्य नाम (ड)विशेषण

**प्र.१८– या गावात बरेच 'नारद' आहेत. नामाचा प्रकार ओळ–खा.**
(अ)विशेष नाम (ब)सामान्य नाम (क)भाववाचक नाम (ड)धातूवाचक नाम

**प्र.१९–सदू बैलाल मारतो या वाक्यातील कर्म ओळखा.**
(अ)सदू (ब)बैलाल (क)मारतो (ड)वरील सर्व

**प्र.२०–'अग्रेसर' समास ओळखा.**
(अ)अव्ययीभाव (ब)व्दंव्द (क)तत्पुरुष (ड)व्दिगू

**प्र.२१–विशेष नाम ओळखा.**
(अ)शांती (ब)विश्वास (क)नवलाई (ड)किसन

**प्र.२२–'धी' या शब्दाचा अर्थ ......... आहे.**
(अ)नदी (ब)पृथ्वी (क)बुद्धी (ड)पालवी

**प्र.२३– देशी शब्द ओळखा.**
(अ)खोली (ब)भाऊ (क)सासरा (ड)घोडा

**प्र.२४–'त्रिशंकु' म्हणजे काय?**
(अ)सहजसाध्य (ब)त्रिशुल (क)अधांतरी (ड)यापैकी नाही

**प्र.२५–'मी पत्र लिहीत असे' या वाक्यातील काळ ओळखा.**
(अ)रीती भुतकाळ (ब)रीती वर्तमानकाळ (क)रीती भविष्यकाळ (ड)अपुर्ण भूतकाळ

**प्र.२६–'दिग्दर्शक' या शब्दाचे स्त्रीलिंगी रूप कोणते?**
(अ)दिग्दर्शकी (ब)दिग्दर्शका (क)दिग्दर्शिकी (ड)दिग्दर्शिक

**प्र.२७–'सुहासने गोष्टीचे पुस्तक वाचले.' यातील प्रयोग ओळ–खा.**
(अ)सकर्मक कर्तरी (ब)कर्तरी (क)कर्मणी (ड)अकर्मक कर्तरी

**प्र.२८–'शेजारपाजार' हा शब्द .......... या प्रकारात मोडतो.**
(अ)अभ्यस्त (ब)अनुकरणवाचक (क)तत्सम (ड)देशी

**प्र.२९– 'पती' या शब्दाचा समानार्थी शब्द पुढील पर्यायातून निवडा?**
(अ)प्रियकर (ब)भ्रतार (क)जिवलग (ड)सखा

**प्र.३०–'हलाहल' या शब्दाचा अर्थ काय?**
(अ)अमृत (ब)विष (क)हाल (ड)नांगर

**प्र.३१– 5 X 5 + 4 = 8 ÷ २ X 3 - 6 = ?**
(अ)२७ (ब)२१ (क)२९ (ड)१२१

**प्र.३२–३९५२ ÷ ५२ = ?**
(अ)७६ (ब)६६ (क)७८ (ड)६६

**प्र.३३–** $\frac{०.५ X ०.५ X ०.५}{०.०५ X ०.५}$ **?**
(अ)०.५ (ब)५ (क)५० (ड)५.५

**प्र.३४–७६ चा शेकडा २० काढा.**
(अ)१६.२ (ब)१५.२ (क)१८.२ (ड)१७.२

**प्र.३५–एका वस्तुच्या खरेदी किमतीच्या दीडपट विक्रिची किंमत आहे. तर शेकडा नफा किती?**
(अ)५० (ब)६० (क)७० (ड)२५

**प्र.३६–शामरावांनी ८१५ रुपयास घेतलेले टेबल ७२५ रुपयास विकले, तर शेकडा नफा किती?**
(अ)७० रुपये (ब)९० रुपये (क)८० रुपये (ड)९५ रुपये

**प्र.३७–एका वस्तुच्या खरेदी किमतीच्या दीडपट विक्रिची किंमत आहे. तर तर शेकडा नफा किती ?**
(अ)५० (ब)६० (क)७० (ड)२५

**प्र.३८– ३०० मी. लांबीची एक आगगाडी एक सिग्नल स्तंभ २४ सेंकदात ओलांडत असल्यास तिचा ताशी वेग किती?**
(अ)७.५ कि.मी. (ब)०.२५ कि.मी. (क)०.७५ कि.मी. (ड)०.५ कि.मी.

**प्र.३९–१६ व २४ यांचा ल.सा.वि. किती?**
(अ)९६ (ब)३२ (क)३८ (ड)४८

**प्र.४०–१८ व २४ यांचा म.सा.वि. किती?**
(अ)६ (ब)४ (क)१२ (ड)२४

**प्र.४१–७० व १०५ या दोन संख्यांचा ल.सा.वि. २१० आहे, तर म.सा.वि. किती?**
(अ)२५ (ब)४५ (क)१५ (ड)३५

**प्र.४२–वसंधुरा धरणी तसे सरिता .......... ?**
(अ)समुद्र (ब)मेघ (क)वर्षा (ड)नदी

**प्र.४३–'अश्रु–डोळे' तसे रसना .......... ?**
(अ)कान (ब)नाक (क)जीभ (ड)थंडपेय

**प्र.४४– DW, CX, BY......... ?**
(अ)EF (ब)AZ (क)EV (ड)FU

**प्र.४५–KP=11, LO=12, HS= ?**
(अ)18 (ब)7 (क)5 (ड)8

**प्र.४६–CX, HX, EV, B_,A_ ?**
(अ)Y,J (ब)W,X (क)V,W (ड)CD

**प्र.४७–DEF,GFE,IJK ..... ?**
(अ)LMN (ब)LKJ (क)KLM (ड)JKL

**प्रश्न क्रमांक ४८८ ते ५० मधील विसंगत पर्याय कोणता?**

**प्र.४८–**(अ)पेटी (ब)तबला (क) हालगी (ड)बासरी

**प्र.४९–**(अ)गाय (ब)बैल (क)कुत्रा (ड)सिंह

**प्र.५०–**(अ)अँल्युमिनीयम (ब)तांबे (क)पीतळ (ड)चांदी

**प्र.५१– 'किकियू' जमाती कोणत्या देशामध्ये आढळतात?**
(अ)कॅनडा (ब)सुदान (क)केनिया (ड)ऑस्ट्रेलिया

**प्र.५२–'वॉर्सा' शहर कोणत्या नदीचे काठीवर बसले आहे?**
(अ)विस्तुला (ब)वारी (क)हडसन (ड)मिसिसीपी

**प्र.५३–'बल्गेरिया' देशाची राजधानी कोणती?**
(अ)नासाहु (ब)साफिया (क)हॅमिल्टन (ड)अल्जिअर्स

**प्र.५४–'इंटरनॅशनल फंड फॉर ॲग्रककल्चरत्न डेव्हलपममेंट' या संस्थेचे मुख्यालय कोठे आहे?**
(अ)जिनीव्हा (ब)व्हिएन्ना (क)रोम (ड)न्यूऑर्क

**प्र.५५– 'डॉ. झिवॉगो' ही साहित्यकृती कोणी तयार केली?**
(अ)अमृता प्रितम (ब)मुल्कराज आनंद (क)बोरिस पास्तरनाक (ड)माइन काम्फ

**प्र.५६–'हवाईदल दिन' कोणत्या दिवशी साजरा करण्यात येतो?**
(अ)८ मे (ब)८ जून (क)१८ सप्टेंबर (ड)८ ऑक्टोबर

**प्र.५७–'पलामु' अभयारण्य कोणत्या राज्यात आहे?**
(अ)छत्तीसगड (ब)झारखंड (क)मध्यप्रदेश (ड)बिहार

**प्र.५८–'तिरूचिरापल्ली' शहर कोणत्या नदी काठावर वसले आहे?**
(अ)कृष्णा (ब)तुंगभद्रा (क)कावेरी (ड)भिमा

**प्र.५९–'मिनी' ही कोणत्या राज्याची प्रमुख भाषा आहे?**
(अ)मणिपूर (ब)नागालँड (क)आसाम (ड)अरूणाचल प्रदेश

**प्र.६०–'सादिक अली खाँ' हे कोणत्या वाद्यांशी संबंधित नाव आहे?**
(अ)वीणा (ब)शहनाई (क)व्हायोलीन (ड)सरोद

**प्र.६१– 'गिरीजा' ही कोणत्या पिकाची प्रमुख जात आहे?**
(अ)ऊस (ब)करडई (क)तांदुळ (ड)एरंडी

**प्र.६२– 'बेडसा' हे गुंफा मंदीर कोणत्या जिल्ह्यात आहे?**
(अ)उस्मानाबाद (ब)पुणे (क)औरंगाबाद (ड)रायगड

**प्र.६३– विधीमंडळाने 'रोजगार हमी योजना' केव्हा मजूर केली?**
(अ)२१ डिसेंबर १९७५ (ब)१५ डिसेंबर १९७४ (क)२० डिसेंबर १९७४ (ड)१५ ऑक्टोबर १९७४

**प्र.६४–'भु–गर्भातील पदार्थांचा अभ्यास' चे शास्त्राचे नाव खालीलपैकी कणते?**
(अ)मिनरलॉजी (ब)मीटीअरॉलॉजी (क)मेटॅलर्जी (ड)ॲकॉस्टिक्स

**प्र.६५–'रेफ्रिजरेटर' चा शोध ाकेणी लावला?**
(अ)टेलर व यंग (ब)पार्किन्स (क)सिकोर्स्की (ड)कोल्ट

**प्र.६६–'क्षयाचे जंतु' खा शोध कोणी लावला?**
(अ)ब्रल लुईस (ब)एडवर्ड जेन्नर (क)चॅडविक (ड)कॉक

**प्र.६७–'सूक्ष्मदर्शक' चे इंग्रजी नाव खालीलपैकी कोणते?**
(अ)मायक्रोमीटर (ब)मायक्रोस्कोप (क)फोटोमीटर (ड)कॅलिडीस्पोक

**प्र.६८–खालीलपैकी 'माळशेज घाट' कोठून कोठे जातो?**
(अ)भोर महाड (ब)कराड चिपळूण (क)वाई – महाबळेश्वर (ड)आळेफाट – कल्याण

**प्र.६९–'उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ' ची स्थापना व स्थान कोणते?**
(अ)१९८९ जळगाव (ब)१९८९ वर्धा (क)१९८० जळगाव (ड)१९८९ पुणे

**प्र.७०–अनेर धरण कोणत्या जिल्ह्यात आहे?**
(अ)नंदुरबार (ब)जळगाव (क)धुळे (ड)नाशिक

**प्र.७१–महाराष्ट्राचे 'आदिवासी विकास मंत्री' कोण आहेत?**
(अ)प्रकाश मेहता (ब)विनोद तावडे (क)विष्णु सावरा (ड)राजकुमार बडोले

**प्र.७२–'केद्रीय हवामान बदल राज्यमंत्री' कोण आहेत?**
(अ)अनिल देव (ब)पियुष गोयल (क)महेश शर्मा (ड)श्रीपाद नाईक

**प्र.७३–'राष्ट्रीय कामगार आयोगाचे अध्यक्ष' कोण आहेत?**
(अ)न्या.एल.एल.दत्तू (ब)रामेश्वर ओराव (क)डॉ.एम.एस.स्वामीनाथन (ड)रविंद्र शर्मा

**प्र.७४–भारताचे WTo तील करयमचे प्रतीनीधी कोण आहेत?**
(अ)अजित शर्मा (ब)अजित कुमार (क)दिपक गुप्ता (ड)राकेश सूद

**प्र.७५–'कहालगाव' औष्णिक विद्युत प्रकल्प कोणत्या राज्यात आहे?**
(अ)बिहार (ब)झारखंड (क)उत्तरप्रदेश (ड)छत्तीशगड

**प्र.७६– खालीलपैकी कोणास २०१६ मध्ये पद्मविभूषण देण्यात आला नाही?**
(अ)स्व.धीरूभाई अंबानी (ब)गिरीजा देवी (क)व्ही.के.अत्रे (ड)अनुपम खेर

**प्र.७७–'टु द पॉईंट' या पुरस्काराचे लेखक कोण?**
(अ)हर्शेल गिब्ज (ब)बराक ओबामा (क)फिडेल कॅस्ट्रो (ड)शशी थरूर

**प्र.७८–'संयुक्त राष्ट्र संघटनेची' स्थापना केव्हा केली?**
(अ)२४ नोव्हे. १९४५ (ब) २४ ऑक्टो. १९४५ (क)२४ सप्टें. १९४५ (ड)२४ ऑक्टो. १९४६

**प्र.७९– ८८ व्या ऑस्कर २०१६ चा सर्वोकृष्ट चित्रपट पुरस्कार ............ या चित्रपटास मिळाला?**
(अ)द रेव्हनंट (ब)स्पॉट लाईट (क)क्विन (ड)बर्डमॅन

**प्र.८०–'राष्ट्रीय बाालिका दिवस' कधी साजरा केला जातो?**
(अ)२० जानेवारी (ब)२२ जानेवारी (क)२४ जानेवाारी (ड)३० जानेवारी

**प्र.८१– Pakke-Paga महोत्सव कोणत्या राज्याशी संबंधित आहे?**
(अ)आंध्र प्रदेश (ब)नागालँड (क)मिझोराम (ड)अरुणाचल प्रदेश

**प्र.८२–ल्कायमेंट चेंज परफॉर्मन्स इंडेक्स (CCPI) २०१७ मध्ये भारत कोणत्या क्रमांकावर आहे?**
(अ)३२ (ब)२२ (क)२० (ड)२१

**प्र.८३–लंडन येथे खेळल्या गेलेल्या २०१६ ATP मध्ये भारत कोणत्या क्रमांकावर आहे?**
(अ)रॉजर फेडरर (ब)नोवाक जोकोविक (क)अँडी मरे (ड)राफेल नादाल

**प्र.८४–महाराष्ट्र राज्यातील पहिले डिजीटल गाव (कॅरालेस) गाव म्हॅणून कोणते गाव प्रयिध्द आहे?**
(अ)धसई (ब)आकोदरा (क)मिसिरपूर (ड)पाचगाव

**प्र.८५–२०१९ च्या राष्ट्रीय क्रिडा स्पर्धा कोणत्या राज्यात नियोजित आहेत?**
(अ)केरळ (ब)हिमाचल प्रदेश (क)तामिळनाडू (ड)आंध्रप्रदेश

**प्र.८६–खालीलपैकी कोणत्या भारतीय खेळाडूने २०१६ रिओ ऑलिम्पिक उद्‌घाटन समारंभात भारतीय पथकाने नेतृत्व केले?**
(अ)अपुर्व चंडेला (ब)सानिया मिर्झा (क)दत्तु भोकलन (ड)अभिनव बिंद्रा

**प्र.८७– M-visa ही सुविधा ग्राहकांसाठी कोणत्या बँकेने भारतात सुरू केली?**
(अ)स्टेट बँक ऑफ इंडिया (ब)बँक ऑफ महाराष्ट्र (क)बँक ऑफ इंडिया (ड)पंजाब नॅशनल बँक

**प्र.८८–महाराष्ट्र शासनाने मुख्यमंत्री ग्रामसडक योजने अंतर्गत किती किलोमीटर लांबीच्या रस्त्यांची कामे करण्याचे उद्दीष्ट निश्चित केले आहे?**
(अ)३० हजार कि.मी. (ब)२० हजार कि.मी. (क)४० हजार कि.मी. (ड)२५ हजार कि.मी.

**प्र.८९– राष्ट्रीय फॅशन टक्नॉलॉजी संस्था (NIFT) च्या अध्यक्षपदी अलीकडे कोणाची नियुक्ती करण्यात आली?**
(अ)रवी शास्त्री (ब)गजेंद्र चौहान (क)चेतन चौहान (ड)रघुराम राजन

**प्र.९०–जगातील सर्वात मोठा रॉकेट डेल्टा–IV चे प्रक्षेपण कोणत्या देशाने केले?**
(अ)जपान (ब)चीन (क)अमेरिका (ड)भारत

**प्र.९१– महाराष्ट्र सरकारने राज्य फुलपाखरू म्हणून ........... फुलपाखराला मान्यता दिली आहे.**
(अ)व्हाईट मॉरन (ब)ब्लु मॉरमॉन (क)रेड हट (ड)वरील सर्व

**प्र.९२–'तपकिरी क्रांती' कशाशी संबंधित आहे?**
(अ)खम उत्पादन (ब)चामडे उत्पादन (क)झिंगे उत्पादन (ड)ताग उत्पादन

**प्र.९३– भारतातील पहिले वाय–फाय गाव कोणते?**
(अ) मिदनापूर (ब)पाचगाव (क)पलक्कड (ड)हरिके

**प्र.९४–ने संगीताची शहरे योजनेत भारतातील कोणत्या शहरात समावेश केला आहे?**
(अ)वाराणसी (ब)लखनौ (क)पुणे (ड)बंगळरू

**प्र.९५– केंद्र सरकार २०१७–१८ साठी केंद्रीय अर्थसंकल्प कोणत्या तारखेस साादर केला?**
(अ)१ जाने.२०१७ (ब)१ फेब्रु. २०१७ (क)१ मार्च. २०१७ (ड)१ एप्रिल. २०१७

**प्र.९६–नऊ ग्रामपंचायत सदस्य असलेल्या गावाची लोकसंख्या क्ति असते?**
(अ)३०० ते ४०० (ब)१५०१ ते ३००० (क)१५०१ ते ५००१ (ड)५००१ ते ५५००

**प्र.९७– 'ऋतुजा बक्षी' हे कोणत्या खेळाशी संबंधित आहे?**
(अ)कॅरम (ब)कबड्डी (क)बुध्दीबळ (ड)ॲथलेटीक्स

**प्र.९८– भारतीय अंतराळ संशोधन संस्था इस्त्रोने कोणत्या ठिकाणी 'गिरी रडार' प्रणालीची स्थापना केली?**
(अ)कॅरम (ब)कबड्डी (क)बुध्दीबळ (ड)ॲथलेटीक्स

**प्र.९९–२०१६ चा विश्व स्नूकी चॅम्पियनशीप विजेता कोण?**
(अ)मार्क विल्यम्स (ब)मार्क सेल्बी (क)डिंग जुन हुई (ड)रुनी ओ सुलिवन

**प्र.१००–२०१६ चा टेनिसमधील डेव्हिस कप कोणत्या देशाने जिंकला?**
(अ)इंग्लंड (ब)स्पेन (क)अर्जेंटिना (ड)क्रोएशिया

## वरील प्रश्नांची उत्तरे

**उत्तरे-** (१) अ (२) अ (३) ब (४) ड (५) अ (६) क (७) क (८) क (९) ड (१०) ब (११) क (१२) क (१३) क (१४) क (१५) ब (१६) ड (१७) क (१८) ब (१९) ब (२०) क (२१) ड (२२) क (२३) ड (२४) क (२५) ड (२६) ब (२७) क (२८) अ (२९) ब (३०) ब (३१) ब (३२) अ (३३) ब (३४) ब (३५) ड (३६) ब (३७) अ (३८) क (३९) ड (४०) अ (४१) ड (४२) ड (४३) क (४४) ब (४५) ड (४६) अ (४७) ब (४८) ड (४९) क (५०) क (५१) क (५२) अ (५३) ब (५४) क (५५) क (५६) ड (५७) ब (५८) क (५९) ड (६०) अ (६१) ड (६२) ब (६३) क (६४) अ (६५) ब (६६) ड (६७) अ (६८) ड (६९) अ (७०) क (७१) क (७२) अ (७३) ड (७४) ब (७५) अ (७६) ड (७७) अ (७८) ब (७९) ब (८०) क (८१) ड (८२) क (८३) क (८४) अ (८५) ड (८६) ड (८७) अ (८८) अ(८९) क (९०) क (९१) ब (९२) ब (९३) ब (९४) अ (९५) ब (९६) ब (९७) क (९८) ब (९९) ब (१००) क

# 'टीम इंडिया म्हणून...' नीति आयोगाच्या बैठकीतील १० महत्त्वाचे मुद्दे

**नौकरी एक्सप्रेस**

**वी दिल्ली /प्रतिनिधी/** राजधानी दिल्लीत आज नीति आयोगाच्या गव्हर्निंग कौन्सिलच्या १० वी बैठक पार पडली. या बैठकीत देशाच्या विकासासाठी एक नवी ब्लूप्रिंट तयार करण्यात आली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राज्यांचे मुख्यमंत्री आणि केंद्रशासित प्रदेशांच्या प्रतिनिधींसह 'विकसित भारत २०४७' चे स्वप्न साकार करण्यासाठी काही महत्वाचे पावले विचारले आहेत. नीती आयोगाचे सीईओ बीव्हीआर सुब्रमण्यम यांनी सांगितले की, या बैठकीत विक्रमी ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेश सहभागी झाले.

बैठकीत विक्रमी सहभाग, पण ५ राज्ये अनुपस्थित

नीती आयोगाच्या या बैठकीत ३६ पैकी ३१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांनी भाग घेतला होता. जो आतापर्यंतचा सर्वाधिक सहभाग आहे.

पण कर्नाटक, केरळ, पुदुचेरी, पश्चिम बंगाल आणि बिहार यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दल आधीच कळवले होते.

'विकसित भारतासाठी' मास्टरप्लॅन

बैठकीचा मुख्य अजेंडा 'विकसित भारतासाठी, विकसित राज्ये' असा होता. पंतप्रधान मोदींनी सर्व राज्यांना त्यांचे विकासाचे दृष्टिकोन राष्ट्रीय दृष्टिकोनाशी जोडण्याचे आवाहन केले. गेल्या वर्षीच्या बैठकीपासून ही थीम सुरू आहे आणि आता ती राज्यांसाठी एक रोडमॅप बनली आहे.

राज्यांचे व्हिजन महत्वाचे

राज्यांना त्यांच्या विकासासाठी दीर्घकालीन योजना बनवण्याच्या सूचना पंतप्रधानांनी केल्या आहेत. प्रत्येक राज्य त्यांच्या संसाधनांनुसार, संस्कृतीनुसार आणि गरजांनुसार एक ब्लूप्रिंट तयार करतील, ज्यामुळे 'विकसित भारत २०४७' चे ध्येय साध्य होण्यास मदत होणार आहे.

नीति आयोगाचा कृती अहवाल सादर

या बैठकीत, नीती आयोगाने त्यांचा कृती अहवाल सादर केला आहे, ज्यामध्ये गेल्या वर्षीच्या अजेंड्यावर केलेल्या कामाची माहिती होती. हा अहवाल राज्ये आणि केंद्र यांच्यातील सहकार्य अधिक मजबूत करण्यासाठी आधार ठरणार आहे.

'आपल्याला टीम इंडियासारखे काम करावे लागणार'

पंतप्रधान मोदींनी बैठकीत सहकारी संघराज्यवादावर भर दिला आहे. विकासाची गती आणखी वाढवण्यासाठी केंद्र आणि राज्ये एकत्रितपणे काम करतील, असे त्यांनी अधोरेखित केले आहे. ही बैठक या दिशेने एक मोठे पाऊल होते. पंतप्रधान म्हणाले की, आपल्याला टीम इंडियासारखे काम करावे लागणार आहे.

नीति आयोगाचे सीईओंनी सांगितले की, बैठकीत सकारात्मक वातावरण होते. राज्यांनी त्यांचे अनुभव, आव्हाने आणि यश सामायिकपणे व्यक्त केले. ज्यामुळे एकमेकांकडून काहीतरी शिकण्याची संधी मिळाली.

समाविष्ट नसलेल्या राज्यांबद्दल काय?

जरी ५ राज्ये बैठकीला अनुपस्थित राहिली तरी, नीति आयोगाने स्पष्ट केले की, या राज्यांनी त्यांच्या अनुपस्थितीबद्दल आधीच माहिती दिली होती. या राज्यांशी स्वतंत्र संवाद केला जाणार आहे.

आर्थिक विकासासाठी नवी धोरणे

आर्थिक विकास, गुंतवणूक आणि रोजगार निर्मिती या महत्वाच्या विषयांवर बैठकीत चर्चा करण्यात आली. गुंतवणूक आकर्षित करण्यासाठी आणि पायाभूत सुविधा मजबूत करण्यासाठी राज्यांना नवीन सूचना देण्यात आल्या.


नवोपक्रमावर लक्ष केंद्रित करण्याची गरज

पंतप्रधान मोदींनी तंत्रज्ञान आणि नवोपक्रम हे विकासाचे इंजिन असल्याचे अधोरेखित केले आहे. डिजिटल पायाभूत सुविधा आणि स्टार्टअप्सना प्रोत्साहन देण्यासाठी राज्यांना ठोस पावले उचलण्यास सांगण्यात आले.

'एक भारत, सर्वोत्तम भारत' ची भावना

या बैठकीत 'एक भारत, सर्वोत्तम भारत'ची भावना बळकट करण्यावर भर देण्यात आला आहे. पंतप्रधानांनी म्हटले की, २०४७ पर्यंत देशाला विकसित राष्ट्र बनवण्याचा मार्ग म्हणजे सर्व राज्यांनी एकत्र काम करणे

## संक्षिप्त




## UPSC चे पूर्वपरीक्षा वेळापत्रक जाहीर

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) रविवार, २५ मे रोजी नागरी सेवा प्राथमिक परीक्षा (प्रिलिम्स) घेणार आहे. या परीक्षेसाठी नोंदणी केलेले उमेदवार आता UPSC च्या अधिकृत वेबसाइट upsconline.gov.in वरून त्यांचे ई-प्रवेशपत्र डाउनलोड करू शकतात. परीक्षेला बसणाऱ्या सर्व उमेदवारांना त्यांच्यासोबत ई-प्रवेशपत्राची छापील प्रत आणि वैध फोटो ओळखपत्र जसे की आधार, पॅन, ड्रायव्हिंग लायसन्स इत्यादी आणणे आवश्यक आहे.

**दोन सत्रात परीक्षा**
पेपर १ (सामान्य अध्ययन): सकाळी ९:३० ते ११:३०
पेपर २ (CSAT): दुपारी २:३० ते ४:३०

या दोन कागदपत्रांशिवाय परीक्षा केंद्रात प्रवेश दिला जाणार नाही. परीक्षेच्या दिवशी कोणतीही अडचण येऊ नये म्हणून यूपीएससीने सर्व विद्यार्थ्यांना प्रवेशपत्रावर दिलेल्या सर्व सूचना काळजीपूर्वक वाचण्याचा सल्ला दिला आहे. त्यामुळे जे विद्यार्थी युपीएससी परीक्षा देणार आहेत त्यांच्यासाठी ही अत्यंत महत्त्वाची बातमी आहे.

यूपीएससी पूर्वपरीक्षा (प्रिलिम्स) ही एक प्रकारची स्क्रीनिंग परीक्षा आहे. यामध्ये मिळालेले गुण अंतिम गुणवत्ता यादीत समाविष्ट केले जात नाहीत. याचा अर्थ असा की प्रिलिम्सचा उद्देश फक्त हे ठरवणे आहे की कोणते उमेदवार मुख्य परीक्षेत बसण्यास पात्र आहेत. प्रिलिम्स उत्तीर्ण झालेले उमेदवारच मुख्य परीक्षेला बसू शकतील. अंतिम रँकमध्ये, फक्त मुख्य परीक्षा आणि मुलाखतीचे गुण जोडले जातात, पूर्वपरीक्षेचे गुण जोडले जात नाहीत.

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (UPSC) पूर्व परीक्षेत दोन वस्तुनिष्ठ (MCQ आधारित) पेपर असतात, प्रत्येक पेपरमध्ये २०० गुण असतात. पहिला पेपर सामान्य अध्ययन (सामान्य अभ्यास पेपर-१) आहे ज्यामध्ये चालू घडामोडींसह इतिहास, भूगोल, राजकारण, अर्थव्यवस्था, विज्ञान आणि तंत्रज्ञानाशी संबंधित विषयांवर प्रश्न विचारले जातात. दुसरा पेपर CSAT (सिव्हिल सर्व्हिसेस ॲप्टिट्यूड टेस्ट) आहे, जो सामान्य अध्ययन पेपर-II म्हणूनही ओळखला जातो. यामध्ये उमेदवारांची आकलन क्षमता, तार्किक विचारसरणी, गणितीय कौशल्ये आणि विश्लेषणात्मक क्षमता तपासली जाते.

मुख्य परीक्षा या तारखेला होईल

दोन्ही पेपर हिंदी आणि इंग्रजी भाषेत आहेत आणि प्रत्येक पेपरसाठी दोन तासांचा वेळ आहे. विशेष म्हणजे CSAT पेपर फक्त पात्रता आहे, म्हणजेच हा पेपर उत्तीर्ण होणे आवश्यक आहे, परंतु त्याचे गुण गुणवत्तेत जोडले जात नाहीत. CSAT पास होण्यासाठी, उमेदवाराला किमान ३३% गुण (६६ गुण) मिळवणे अनिवार्य आहे. मुख्य परीक्षा २२ ऑगस्टपासून सुरू होण्याची शक्यता आहे.

विद्यार्थ्यांनी वेबसाईटवर जाऊन योग्य तपासणी करून घ्यावे आणि परिक्षेची योग्य तयारी करायला घ्यावी. तसंच युपीएससी ही परीक्षा अत्यंत कठीण असते त्यामुळे आपल्या आरोग्याचीही तितकीच काळजीदेखील घ्यावी.

# NPCIL ने काकरापार प्रकल्पासाठी विविध पदांसाठी भरती

न्यूक्लिअर पॉवर कॉर्पोरेशन ऑफ इंडिया लिमिटेड (NPCIL) ही भारत सरकारच्या अणुऊर्जा विभागांतर्गत कार्यरत असलेली एक अत्यंत महत्त्वाची सार्वजनिक क्षेत्रातील संस्था आहे. ही संस्था काकरापार गुजरात प्रकल्पासाठी विविध पदांवर भरती करत असून त्यासाठी NPCIL/KAKRAPAR GUJAR-T SITE/HRM²/01/2025 ही जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली आहे. भारताच्या अणुऊर्जा क्षेत्रात उच्च-तंत्रज्ञानाच्या वातावरणात काम करण्याची संधी शोधत असलेल्या उमेदवारांसाठी ही सुवर्णसंधी आहे.

ही भरती प्रक्रिया २८ मे २०२५ पासून सुरू होत असून ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत १७ जून २०२५ रोजी सकाळी ११:०० वाजेपर्यंत आहे. अर्ज करण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी NPCIL च्या अधिकृत वेबसाइट www.npcilcareers.co.in ला भेट द्यावी. या भरतीसाठी भारतातील कोणताही पात्र नागरिक अर्ज करू शकतो. यामध्ये नवशिक्या आणि अनुभवी दोघांनाही संधी आहे.

सध्या प्रसिद्ध झालेल्या संक्षिप्त अधिसूचनेमध्ये वयोमर्यादेची सविस्तर माहिती दिलेली नाही. मात्र वयोमर्यादा व त्यातील सूट केंद्र सरकारच्या नियमानुसार असणार आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांनी लवकरच प्रसिद्ध होणारी सविस्तर अधिसूचना काळजीपूर्वक वाचावी. निवड पद्धत ही पदानुसार लेखी परीक्षा किंवा संगणक आधारित परीक्षा, कौशल्य चाचणी किंवा मुलाखत, कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणी अशा टप्प्यांमधून होणार आहे. अंतिम निवड ही उमेदवारांच्या गुणवत्ता यादी आणि निवड प्रक्रियेतील कामगिरीच्या आधारे केली जाईल.

अर्ज करण्याची प्रक्रिया सोपी आहे - उमेदवारांनी अधिकृत वेबसाइटवर जाऊन नोंदणी करावी, ऑनलाईन फॉर्म भरावा,आवश्यक कागदपत्रे, फोटो व स्वाक्षरी अपलोड करावी आणि अर्ज सबमिट करावा. अर्जाची प्रिंट स्वतःकडे ठेवावी, जेणेकरून भविष्यात त्याचा उपयोग होऊ शकेल. सरकारी नोकरी शोधणाऱ्या उमेदवारांसाठी NPCIL भरती २०२५ ही एक उत्तम संधी असून त्यांनी दिलेल्या वेळेत अर्ज करावा व ही संधी साधावी.

# NMDC मध्ये ६८३ प्रशिक्षणार्थी पदांसाठी भरती

नॅशनल मिनरल डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन (NMDC) लिमिटेड या इस्पात मंत्रालयांतर्गत येणाऱ्या भारत सरकारच्या नवरत्न सार्वजनिक क्षेत्रातील कंपनीने भरतीसाठी जाहिरात प्रसिद्ध केली आहे. ही भरती अधिसूचना क्र. ०३/२०२५ दिनांक २२ मे २०२५ रोजी प्रसिद्ध करण्यात आली असून, छत्तीसगडमधील किरंदुल, बचेली आणि कर्नाटकमधील दोणिमलाई येथील विविध युनिट्ससाठी ही भरती होणार आहे. खाणकाम व इस्पात उद्योगात कारकीर्द घडवू इच्छिणाऱ्या उमेदवारांसाठी ही एक उत्तम संधी आहे. तसेच कामाच्या शोधात असणाऱ्या आणि कामासाठी राज्यभाहेर जाऊन काम करण्याची तयारी असणाऱ्या लोकांसाठी ही उत्तम संधी आहे.

या भरतीत एकूण ६८३ पेक्षा अधिक रिक्त पदांची घोषणा करण्यात आली आहे. फील्ड अटेंडंट, मेंटेनन्स असिस्टंट, एचईएम ऑपरेटर, ब्लास्टर आणि इतर विविध प्रशिक्षणार्थी पदांसाठी अर्ज मागवण्यात




आले आहेत. इच्छुक व पात्र उमेदवारांना २५ मे २०२५ ते १४ जून २०२५ या कालावधीत अधिकृत संकेतस्थळ www.nmdc.co.in च्या उरीशशी विभागात जाऊन ऑनलाईन अर्ज करता येईल. या भरतीसाठी पात्रतेसाठी वयोमर्यादा १४ जून २०२५ रोजी किमान १८ वर्षे व कमाल ३० वर्षे इतकी आहे. अनुसूचित जाती व जमातीच्या उमेदवारांना ५ वर्षे, ओबीसी (नॉन क्रीमी लेयर) उमेदवारांना ३ वर्षे व अपंग, माजी सैनिक, तसेच खात्यातील कर्मचारी यांना शासन नियमांनुसार वय सवलत दिली जाणार आहे.

निवडप्रक्रिया दोन टप्प्यात पार पडणार आहे. प्रथम टप्पा म्हणजे १०० गुणांची OMR/ कंप्युटर आधारित चाचणी (CBT) होईल. दुसऱ्या टप्प्यात शारीरिक क्षमता चाचणी किंवा ट्रेड टेस्ट असेल, जे पदाच्या आवश्यकतेनुसार ठरवले जाईल. दुसरा टप्पा केवळ पात्रता तपासण्यासाठी असेल.

अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी सर्व आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून अपलोड करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर शुल्क देखील ऑनलाइन पद्धतीने भरावे लागेल. अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंटआऊट भविष्यातील उपयोगासाठी सुरक्षित ठेवावी. नोकरीच्या शोधात असलेल्या उमेदवारांनी ही संधी गमावू नये. NMDC ही देशातील एक प्रतिष्ठित संस्था असून, येथे नोकरी मिळाल्यास सुरक्षित भविष्यासह करिअरमध्ये स्थैर्य मिळू शकते.

# मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये भरती

मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडमध्ये विविध पदांसाठी भरती होणार आहे.

महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ सहाय्यक आणि इतर पदांसाठी एकूण ३६ जागा भरल्या जातील. इच्छुक उमेदवार www.mmrcl.com या वेबसाइटवर ऑनलाइन अर्ज करू शकतात. अर्ज करण्याची अंतिम तारीख १४ जून २०२५ आहे. अधिक माहितीसाठी आणि जाहिरात पाहण्यासाठी वेबसाइटला भेट द्या.

एमएमआरसीएल मुंबईमध्ये विविध पदांसाठी अर्ज मागवण्यात आले आहेत. महाव्यवस्थापक, उपमहाव्यवस्थापक, सहाय्यक महाव्यवस्थापक, वास्तुविशारद, उपनगर नियोजनकार, व्यवस्थापक, उपअभियंता, सहाय्यक व्यवस्थापक, सहाय्यक अभियंता, कनिष्ठ व्यवस्थापक, पर्यवेक्षक, वरिष्ठ सहाय्यक श्रेणी - I, कनिष्ठ अभियंता - II, सहाय्यक (IT)-I, कनिष्ठ सहाय्यक (IT), कनिष्ठ सहाय्यक सह संगणक ऑपरेटर या पदांसाठी ही भरती आहे. एकूण ३६ जागांसाठी MMRCL (Mumbai Metro Rail Corporation Limited) ने जाहिरात काढली आहे. इच्छुक उमेदवार २१ मे २०२५ पासून १४ जून २०२५ पर्यंत ऑनलाईन अर्ज करू शकतात. MMRCL च्या www.mmrcl.com या वेबसाईटवर अर्ज उपलब्ध आहेत.

या भरतीमध्ये खालील पदांचा समावेश आहे:

- महाव्यवस्थापक
- उपमहाव्यवस्थापक
- सहाय्यक महाव्यवस्थापक



- वास्तुविशारद
- उपनगर नियोजनकार
- व्यवस्थापक
- उपअभियंता
- सहाय्यक व्यवस्थापक
- सहाय्यक अभियंता
- कनिष्ठ व्यवस्थापक
- पर्यवेक्षक
- वरिष्ठ सहाय्यक श्रेणी - I
- कनिष्ठ अभियंता - II
- सहाय्यक (IT)-I
- कनिष्ठ सहाय्यक (IT)
- कनिष्ठ सहाय्यक सह संगणक ऑपरेटर (Jr. -ssistant cum computer operator)

या भरतीमध्ये एकूण ३६ जागा भरल्या जाणार आहेत.

अर्ज करण्याची अतिंम दिनांक- १४ जून २०२५ .

**अर्ज पाठवण्याचा पत्ता-** वरिष्ठ उपमहाव्यवस्थापक (मानव संसाधन) ,एमएमआरसीएल, एमएमआरसीएल ट्रान्झिट ऑफिस, ई-ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स,वांद्रे (पूर्व), मुंबई-४०००५१.

अर्ज पाठवण्याची अतिंम दिनांक १४ जून २०२५ आहे.

ऑनलाईन अर्ज २१ मे २०२५ सकाळी १०:०० वाजल्यापासून सुरू होतील आणि १४ जून २०२५ रात्री ११:५९ पर्यंत स्वीकारले जातील. उमेदवारांनी अर्ज करण्यापूर्वी तपशीलवार जाहिरात (जाहिरात PDF) काळजीपूर्वक वाचण्याची विनंती केली आहे.

नोकरीचे ठिकाण मुंबई आहे. अर्ज करण्याची पद्धत ऑनलाईन आणि ऑफलाईन दोन्ही आहे. प्रत्येक पदासाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा आणि पगाराची माहिती जाहिरात PDF मध्ये दिली आहे.

ऑनलाईन अर्ज करणयासाठी अतिंम दिनांक: १४ जून २०२५

## पदवीधारकांसाठी सुवर्णसंधी

# SCL असिस्टंट भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** सेमी कंडक्टर लॅबोरेटरी (SCL) तर्फे सहाय्यक पदासाठी भरती प्रक्रिया पुन्हा एकदा सुरू करण्यात आली आहे. ही भरती पूर्णवेळ व कायमस्वरूपी स्वरूपात केली जात असून, एकूण २५ रिक्त जागांसाठी पात्र उमेदवारांकडून ऑनलाइन अर्ज मागवण्यात आले जाईल. लेखी परीक्षा १०० गुणांची असेल, ज्यामध्ये गणित, बुद्धिमत्ता, संगणक, इंग्रजी व चालू घडामोडी अशा विषयांचा समावेश असेल. प्रत्येक विषयासाठी २० प्रश्न असतील आणि एकूण वेळ २ तासांची दिली जाईल. चुकीच्या उत्तरासाठी १/४ गुण वजा करण्यात येतील.

या भरतीसाठी अर्ज शुल्क सामान्य, ओबीसी व




आहेत. अर्ज करण्याची प्रक्रिया १७ मे २०२५ पासून सुरू झाली असून, २६ मे २०२५ ही अंतिम मुदत आहे. यापूर्वी ज्यांना अर्ज करता आला नाही, अशा इच्छुक उमेदवारांसाठी ही मोठी संधी आहे. उमेदवारांना या भरतीसाठी अर्ज करायचे आहे, त्यांनी हा लेख नक्की वाचा.

अर्ज करू पाहणार्या उमेदवारांना काही पात्रता निकष पात्र करावे लागणार आहेत. या भरतीअंतर्गत सहाय्यक पदासाठी कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवीधर असलेले उमेदवार पात्र मानले जाणार आहेत. अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय २६ फेब्रुवारी २०२५ रोजी १८ ते २५ वर्षांच्या दरम्यान असावे. या पदासाठी निवड प्रक्रियेचा पहिला टप्पा म्हणजे लेखी परीक्षा असून, त्यानंतर दस्तऐवज पडताळणी व वैद्यकीय चाचणी घेतली ईडब्ल्यूएस प्रवर्गातील उमेदवारांसाठी ९४४ इतकं असून, अनुसूचित जाती, जमाती, दिव्यांग व माजी सैनिक उमेदवारांसाठी ४७२ इतकं आहे. हे शुल्क ऑनलाइन पद्धतीने भरावं लागेल. निवड झालेल्या उमेदवारांना वेतनस्तर ४ नुसार २५,५०० ते ८१,१०० पर्यंत पगार मिळणार आहे. एकूण २५ जागांपैकी ११ अनारक्षित, २ ईडब्ल्यूएस, ६ ओबीसी आणि ६ जागा अनुसूचित जाती व जमातींसाठी राखीव ठेवण्यात आल्या आहेत.

या भरतीविषयी अधिक माहिती व ऑनलाइन अर्जासाठी SCL ची अधिकृत वेबसाईट scl.gov.in येथे भेट द्यावी. इच्छुक उमेदवारांनी अंतिम तारखेपूर्वी आपले अर्ज सादर करावेत. ही एक सरकारी नोकरीची उत्कृष्ट संधी असून, पात्र उमेदवारांनी ती निश्चितपणे वापरावी.

# माजी उपमुख्यमंत्री छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी/** महाराष्ट्राचे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी राज्याचे माजी उपमुख्यमंत्री छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांना राज्याच्या मंत्री पदाची शपथ दिली.

**राज्य पालांकडून छगन भुजबळ यांना मंत्री पदाची शपथ**

विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे, विधान परिषदेचे अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत राजभवन मुंबई येथे झालेल्या एका छोटेखानी शपथविधी समारंभात राज्यपालांनी छगन भुजबळ यांना पद आणि गोपनीयतेची शपथ दिली.यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, संसदीय कार्य मंत्री चंद्रकांत पाटील,जलसंपदा (गोदावरी आणि कृष्णा खोरे विकास महामंडळ) मंत्री राधाकृष्ण विखे -पाटील,शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ, उद्योग ,मराठी भाषा मंत्री उदय सामंत,आदिवासी विकास मंत्री अशोक उईके, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्ध व्यवसाय विकास विभाग मंत्री अतुल सावे, क्रिडा व युवक कल्याण मंत्री दत्तात्रय भरणे, कौशल्य विकास,रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट,मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड,खासदार प्रफुल्ल पटेल, सुनील तटकरे,मुंबई पोलीस आयुक्त देवेन भारती,राज्यपाल यांचे सचिव प्रशांत नारनवरे,तसेच मंत्री छगन भुजबळ यांचे कुटूंबीय यावेळी उपस्थित होते.

सुरुवातीला मुख्य सचिव सुजाता सौनिक यांनी शपथविधी सोहळ्यासाठी राज्यपालांची अनुमती मागितली. त्यानंतर राज्यपालांनी छगन भुजबळ यांना शपथ दिली.

शपथविधी नंतर राज्यपालांनीभुजबळ यांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी देखील भुजबळ यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले.

**आज मंत्रीपदाची शपथ घेतलेले**

**छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ यांचा परिचय**

जन्मः-१५ ऑक्टोबर १९४७.

जन्म ठिकाण:-नाशिक.

शिक्षण:-एल.एम.ई. (आय), (मेकॅनिकल इंजिनिअर).

ज्ञात भाषा:- मराठी, हिंदी व इंग्रजी.

वैवाहिक माहिती:- विवाहित, पत्नी श्रीमती मीना.

अपत्ये:-एकूण १ (एक मुलगा).

व्यवसाय:-शेती.

पक्ष:- राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष.

मतदारसंघ:-११९ - येवला, जिल्हा-नाशिक.

इतर माहिती :-संस्थापक-अध्यक्ष, मुंबई एज्युकेशनल ट्रस्ट, बांद्रा, मुंबई, माजी विश्वस्त, व्हि. जे. टी. आय. संस्था, मुंबई, विश्वस्त, नायर रुग्णालय, विश्वस्त, प्रिन्स आगा स्थान रुग्णालय, मुंबई; संस्थापक, महात्मा फुले समता परिषद, या संस्थेमार्फत उपेक्षित पद-दलित, मागासवर्गीयांना न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न तसेच, महात्मा फुले डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहु महाराज यांच्या विचारांचा व आदर्शाचा प्रचार व प्रसार, ५ नोव्हेंबर २०१० रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बराक ओबामा यांना मुंबई भेटी दरम्यान महात्मा फुले यांनी लिहिलेल्या गुलामगिरी या



पुस्तकाचा स्लेव्हरी हा अनुवादीत ग्रंथ भेट दिला; माजी विश्वस्त, मुंबई पोर्ट ट्रस्ट, १९८५ दैवत व १९९०नवरा बायको या मराठी चित्रपटांची निर्मिती; १९७३ सदस्य, १९७३-८४ विरोधी पक्षनेते, १९८५ व १९९१ महापौर, मुंबई महानगरपालिका; याकाळात गृहनिर्माण, झोपडपट्टी सुधारणा, मुंबई शहराचे सौंदर्यकरण, चौकांचे सुशोभिकरण, हुतात्मा चौकाचे सुशोभिकरण केले; १९९१ अध्यक्ष, ऑल इंडिया कौन्सिल ऑफ मेयर्स, १९९१ पर्यंत शिवसेनेत विविध पदावर कार्य; १९९१ नंतर काँग्रेस पक्षात कार्यरत; जून १९९९ पासून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कार्य; संस्थापक-सदस्य व जून १९९९ ते नोव्हेंबर १९९९ महाराष्ट्राचे पहिले प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष; १९८५-९०, १९९०-९५, २००४-२००९, २००९-२०१४, २०१४-२०१९ सदस्य, महाराष्ट्र विधानसभा १९९६-२००२ व २००२-२००४ सदस्य, महाराष्ट्र विधानपरिषदः डिसेंबर १९९१ ते मार्च १९९३ महसूल खात्याचे मंत्री; मार्च १९९३ ते मार्च १९९५ गृहनिर्माण, गलिच्छ वस्ती सुधार, घरदुरुस्ती आणि पुनर्बांधणी खात्याचे मंत्री; १९९६-१९९९ विरोधी पक्ष नेते, महाराष्ट्र विधानपरिषदः ऑक्टोबर १९९९ ते जानेवारी २००३ महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व गृह आणि पर्यटन मंत्री, नोव्हेंबर १९९९ ते जानेवारी २००३ मुंबई शहराचे पालकमंत्री; जानेवारी २००३ ते डिसेंबर २००३ उपमुख्यमंत्री व गृह मंत्री; नोव्हेंबर २००४ ते ऑक्टोबर २००९ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) या खात्यांचे मंत्रीः नोव्हेंबर २००९ ते नोव्हेंबर २०१० दुसऱ्यांदा उपमुख्यमंत्री व सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) खात्याचे मंत्री; नोव्हेंबर २०१० ते सप्टेंबर २०१४ सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री व नाशिक जिल्ह्याचे पालक मंत्री; या काळात दिल्लीतील नवीन महाराष्ट्र सदनाची वास्तु उभी केली.

ऑक्टोबर २०१९ मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवडः जानेवारी २०२० मध्ये अन्न व नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण खात्याचे मंत्री, नोव्हेंबर २०२४मध्ये महाराष्ट्र विधानसभेवर फेरनिवड

**छंदः- क्रिकेट, चित्रपट, वाचन व प्रवास**

परदेश प्रवास:-१९८० आणि १९८६ मध्ये अमेरिका, फ्रान्स, इंग्लंड, जर्मनी, नेदरलैंड आणि रशिया या देशाचा अभ्यास दौरा; १९९१ मध्ये ओसाका, जपान येथे जागतिक महापौर परिषदेसाठीच्या शिष्टमंडळासमवेत सहभाग, ऑक्टोबर २००० मध्ये फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड, दुबई, मस्कत, अबुधाबी, कॅनडा,फ्रान्स, नेदरलँड, बेल्जिअम व स्विझ्लँड इत्यादी देशांचा अभ्यास दौरा, याच दौऱ्यात लंडन मधील स्कॉटलैंड वार्ड पोलिसांच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर चर्चाः २८ मे २००१ ते १८ जून २००१ या काळात न्युयॉर्क, जिनिव्हा, लंडन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा तसेच ऑस्ट्रिया, स्वीडन, नॉर्वे, स्पेन इत्यादी देशांचा अभ्यास दौरा.

# रेल्वे स्थानकाच्या फ्री Wi-Fi सुविधेचा वापर करत झाला IAS अधिकारी

काही व्यक्तींच्या जीवनकथा अशा असतात की त्या वाचल्यानंतर नक्कीच वाटतं, हिम्मत असेल तर अशक्य काहीच नाही. केरळमधील मुन्नार येथील श्रीनाथ के. यांची युपीएससी परीक्षेतील यशोगाथा हेच दाखवून देते. गरिबी, संघर्ष आणि अपुऱ्या साधनांमधूनही त्यांनी आयएएस अधिकारी बनण्याचं स्वप्न सत्यात उतरवलं. विशेष बाब म्हणजे त्यांनी हे शिक्षण फुकटच्या Wi-Fi सुविधेवर मिळवलेल्या ज्ञानाच्या आधारावर पूर्ण केलं. श्रीनाथ हे एर्नाकुलम रेल्वे स्थानकावर कुली म्हणून काम करत होते. दिवसाला ४००-५०० रुपये मिळायचे. त्याच कमाईवर घर चालवायचं होतं. कोणतीही महागडी कोचिंग क्लासेस नाहीत, ना महागड्या पुस्तके. पण युपीएससीच्या स्वप्नाप्रती असलेली त्यांची जिद्द कोणत्याही अडचणींपुढे कमी पडली नाही.



२०१६ साली रेलटेल आणि गूगलने भारतातील अनेक रेल्वे स्थानकांवर मोफत Wi-Fi सेवा सुरू केली. मुंबई सेंट्रल स्थानकावर काम करत असताना श्रीनाथ यांनी या सुविधेचा पुरेपूर उपयोग केला. त्यांनी स्मार्टफोन आणि हेडफोन घेऊन इंटरनेटवरून ऑडिओ बुक्स, लेक्चर्स, आणि अभ्याससामग्री डाउनलोड करून अभ्यास सुरू ठेवला. काम करताना, विश्रांतीत किंवा रात्री उशिरा वेळ मिळेल तिथे आणि कधीही ते अभ्यास करत होते.

२७ व्या वर्षी त्यांनी स्पर्धा परीक्षांची तयारी सुरू केली. प्रथम त्यांनी केरल लोकसेवा आयोगाची परीक्षा उत्तीर्ण केली आणि सरकारी नोकरी मिळवली. पण त्यांना तिथे थांबायचं नव्हतं. अनेक प्रयत्नांनंतर शेवटी चौथ्या प्रयत्नात त्यांनी UPSC परीक्षा यशस्वीरित्या पास केली आणि आयएएस अधिकारी बनले.२०१८ साली केंद्रीय मंत्री पीयूष गोयल यांनी ट्विटरवरून श्रीनाथ यांचे कौतुक केले. त्यांच्या या यशाची दखल गूगल इंडियानेही घेतली. श्रीनाथ यांची ही कथा शिकवते की यश मिळवण्यासाठी महागड्या साधनांची नव्हे, तर अपार मेहनत, चिकाटी आणि समर्पणाची गरज असते. आज ते हजारो विद्यार्थ्यांसाठी प्रेरणास्रोत बनले आहेत. एक असा माणूस ज्याने रेल्वे स्थानकावर काम करताना डिजिटल तंत्रज्ञानाचा योग्य वापर करून स्वतःचे आयुष्यच बदलून टाकले.

# CISF हेड कॉन्स्टेबल पदासाठी भरती

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/ CISF मार्फत ४०३ हेड कॉन्स्टेबल पदांसाठी स्पोर्ट्स कोट्यांतर्गत भरती जाहीर; अर्ज प्रक्रिया १८ मे ते ६ जून २०२५ दरम्यान सुरु आहे. ही संधी केवळ पात्र क्रीडापटूंना आहे. केंद्रीय औद्योगिक सुरक्षा दलामार्फत (CISF) हेड कॉन्स्टेबल पदांसाठी स्पोर्ट्स कोट्यांतर्गत भरती प्रक्रिया जाहीर करण्यात आली आहे. यासाठी एकूण ४०३ पदे उपलब्ध असून, ही भरती १७ ते २३ मे २०२५ दरम्यान प्रकाशित झालेल्या रोजगार समाचारामधून अधिकृतरीत्या जाहीर करण्यात आली आहे. अर्ज करण्यासाठी अतिमं दिनांक ६ जून २०२५ आहे. त्यामुळे इच्छुक आणि पात्र उमेदवारांनी दिलेल्या वेळेत आपले अर्ज सादर करावेत. या भरतीसाठी अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय दिनांक १ ऑगस्ट २०२५ रोजी किमान १८ वर्षे आणि कमाल २३ वर्षे असणे आवश्यक आहे. तसेच मात्र राखीव प्रवर्गातील उमेदवारांना केंद्र शासनाच्या नियमानुसार वयोमर्यादेत सवलत दिली जाईल.

सीआयएसएफ हेड कॉन्स्टेबल (स्पोर्ट्स कोटा) भरतीसाठी निवड प्रक्रिया इतर भरतींपेक्षा थोडी वेगळी आणि अधिक काटेकोर आहे. सर्वप्रथम अर्जदार उमेदवारांची ट्रायल टेस्ट घेतली जाईल, ज्यामध्ये त्यांच्या संबंधित क्रीडा प्रकारातील प्रत्यक्ष कौशल्यांची तपासणी केली जाईल. ही चाचणी पार केल्यानंतर प्रावीण्य चाचणी घेतली जाईल, ज्यात उमेदवाराने आधी कोणत्या स्पर्धांमध्ये भाग घेतला आहे. त्यांनी कोणते यश संपादन केले आहे, याचा आढावा घेतला जाईल. त्यानंतर उमेदवारांची शारीरिक मापदंड तपासणी (PST), कागदपत्रांची पडताळणी आणि शेवटी वैद्यकीय तपासणी होईल. संपूर्ण निवड प्रक्रिया अत्यंत पारदर्शक आणि गुणवत्ता आधारे होणार असल्यामुळे इच्छुक उमेदवारांनी योग्य तयारीने अर्ज करावा. ही भरती केवळ क्रीडापटूंना उद्देशून आहे,त्यामुळे अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी किमान बारावी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. त्याचबरोबर, मान्यताप्राप्त




क्रीडा संघटनेच्या वतीने राष्ट्रीय किंवा राज्यस्तरावरील स्पर्धांमध्ये प्रतिनिधित्व केलेले असणे गरजेचे आहे.

या भरतीसाठी अर्ज करण्यासाठी उमेदवारांनी अधिकृत वेबसाइट cisfrectt.cisf.gov.in वर भेट द्यावी लागेल. सर्वप्रथम भरतीसंबंधित अधिकृत अधिसूचना काळजीपूर्वक वाचून उमेदवारांनी आवश्यक कागदपत्रांची तयारी करावी. त्यानंतर ऑनलाईन अर्ज भरून, आवश्यक कागदपत्रे अपलोड करून अर्ज फी भरावी आणि अंतिम फॉर्म सबमिट करावा. अर्ज केल्यानंतर त्याची प्रिंट घेणे देखील आवश्यक आहे, जे भविष्यातील संदर्भासाठी उपयुक्त ठरू शकते. ही भरती क्रीडा क्षेत्रातील उमेदवारांसाठी एक सुवर्णसंधी आहे. सरकारी नोकरीसह आपल्या खेळातील कौशल्याचा उपयोग करून देशसेवेचा भाग होण्याची संधी उमेदवारांना मिळणार आहे. त्यामुळे जे उमेदवार आपल्या खेळातील गुणवत्ता सिद्ध करू शकतात, त्यांनी ही संधी हातची जाऊ देऊ नये. योग्य नियोजन, तयारी आणि आत्मविश्वासासह अर्ज केल्यास ही भरती तुमच्या आयुष्यातील टर्निंग पॉईंट ठरू शकते.

# IDBI बँक जूनियर असिस्टंट मॅनेजर भरती

IDBI बँकेने ६७६ ज्युनियर असिस्टंट मॅनेजर पदांसाठी भरती जाहीर केली असून अर्ज करण्याची शेवटची तारीख २० मे २०२५ आहे. पात्र उमेदवारांनी अधिकृत वेबसाइटवर जाऊन लवकरात लवकर अर्ज करावा.IDBI बँकेने २०२५-२६ या वर्षासाठी 'ज्युनियर असिस्टंट मॅनेजर (JAM²), ग्रेड ज' पदांसाठी भरती जाहीर केली आहे. जाहिरात क्रमांक ३/२०२५-२६ अंतर्गत एकूण ६७६ पदांसाठी ही भरती होणार असून इच्छुक आणि पात्र उमेदवारांसाठी ही एक उत्कृष्ट करिअर संधी आहे. ऑनलाईन अर्ज प्रक्रिया ८ मे २०२५ पासून सुरू झाली असून अर्ज करण्याची अंतिम मुदत २० मे २०२५ आहे.




उमेदवारांनी www.idbibank.in या अधिकृत वेबसाइटवर जाऊन अर्ज करावा. ही भरती जलद पदोन्नतीच्या संधीसह सुरू होत असून वार्षिक सीटीसी ६.५० लाखांपर्यंत असू शकतो. निवड प्रक्रिया ऑनलाईन टेस्ट, वैयक्तिक मुलाखत व पूर्व-नियुक्ती वैद्यकीय चाचणी यावर आधारित असेल.

उमेदवारांकडे कोणत्याही शाखेतील पदवी असणे आवश्यक असून अनारक्षित वर्गासाठी किमान ६०% गुण (एससी/एसटी/अपंग साठी ५५%) आवश्यक आहेत. तसेच संगणक साक्षरता अनिवार्य आहे. उमेदवाराचे वय १ मे २०२५ रोजी २० ते २५ वर्षांच्या दरम्यान असावे. म्हणजेच उमेदवाराचा जन्म २ मे २००० ते १ मे २००५ दरम्यान झाला असावा. शासन नियमांनुसार राखीव प्रवर्गातील उमेदवारांना वयोमर्यादेत सूट दिली जाईल -एससी/एसटी साठी ५ वर्षे, ओबीसी साठी ३ वर्षे,अपंग साठी १० ते १५ वर्षे आणि माजी सैनिकांसाठी नियमानुसार सूट आहे.उमेदवारांची निवड ऑनलाईन टेस्ट (बहुपर्यायी स्वरूपातील), कागदपत्र पडताळणी, वैयक्तिक मुलाखत आणि वैद्यकीय चाचणी यावर आधारित असेल. ऑनलाईन टेस्टमध्ये इंग्रजी वगळता इतर प्रश्न इंग्रजी आणि हिंदी अशा दोन्ही भाषांमध्ये असतील. प्रत्येक चुकीच्या उत्तरासाठी ०.२५ गुण वजा करण्यात येतील. सर्व विभागांत आणि एकूण गुणांमध्ये पात्रता मिळवणं आवश्यक आहे.

अर्ज कसा कराल:

IDBI च्या www.idbibank.in या वेबसाइटला भेट द्या, Careers Current Openings विभागात Junior Assistant Manager (JAM²) Grade O - 2025-26 या लिंकवर क्लिक करा.

वैध ईमेल व मोबाइल क्रमांकासह नोंदणी करा, अर्ज फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रे अपलोड करा आणि ऑनलाईन फी भरून अर्ज सादर करा. नंतर अर्जाची प्रिंट व फीची पावती सुरक्षित ठेवा.

# १२ वी पास उमेदवारांसाठी सुवर्णसंधी, बना कमीशन ऑफिसर

**नौकरी एक्सप्रेस**

**मुंबई/ प्रतिनिधी**/इंडियन आर्मी भरती २०२५ ला सुरुवात करण्यात आली आहे. बारावी उत्तीर्ण उमेदवारांना या भरतीसाठी अर्ज करता येणार आहे. कमीशन ऑफिसर पदासाठी ही भरती जाहीर करण्यात आली आहे.



जर तुम्ही भारतीय सैन्यात कमीशन ऑफिसर बनण्याचे स्वप्न पाहत असाल आणि तुम्ही १२ वी विज्ञान शाखेतून (भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र आणि गणित - PCM²) पास असाल, तर तुमच्यासाठी ही एक उत्तम संधी आहे. भारतीय सैन्याने टेक्निकल एन्ट्री स्कीम (TES-54) अंतर्गत भरती प्रक्रिया सुरू केली आहे.

या माध्यमातून पात्र उमेदवारांना स्थायी कमीशन ऑफिसर बनण्याची संधी मिळणार आहे. या भरतीची खास बाब म्हणजे निवड झालेल्या उमेदवारांना सैन्याच्या माध्यमातून स्पॉन्सरशिपवर इंजिनिअरिंग पदवी मिळेल. म्हणजेच, प्रशिक्षण काळातच उमेदवारांना उच्च दर्जाचे तांत्रिक शिक्षण दिले जाईल. ही संधी त्यांना उत्तम सैन्य अधिकारी बनण्यासाठी मदत करेल आणि भविष्यातील करिअरसाठी मजबूत पाया ठरेल.

या भरतीसाठी प्रथम JEE (Main) २०२५ च्या गुणांच्या आधारे उमेदवारांची शॉर्टलिस्टिंग केली जाईल. शॉर्टलिस्ट झालेल्या उमेदवारांना SSB इंटरव्ह्यूसाठी बोलावले जाईल. इंटरव्ह्यूमध्ये यशस्वी ठरलेल्या उमेदवारांची वैद्यकीय चाचणी होईल. अंतिम निवडीनंतर NDA प्रमाणे कठोर पण प्रतिष्ठित प्रशिक्षण दिले जाईल आणि त्यानंतर कमीशन ऑफिसर पदावर नियुक्ती केली जाईल.

उमेदवाराने झउच् विषयांसह १२वी उत्तीर्ण केलेली असावी आणि JEE (Main) २०२५ मध्ये सहभागी झालेले असावे. वयोमर्यादा १६ वर्षे ६ महिने ते १९ वर्षे ६ महिने दरम्यान आहे. म्हणजेच ज्या उमेदवारांचा जन्म २ जुलै २००६ ते १ जुलै २००९ दरम्यान झाला आहे, ते पात्र आहेत.

या भरतीसाठी अर्ज करणयाचा अतिमं दिनांक १२ जून २०२५ आहे.

इच्छुक उमेदवारांनी joinindianarmy.nic.in या अधिकृत वेबसाइटवर जाऊन अर्ज करावा. नवीन वापरकर्त्यांनी प्रथम नोंदणी करावी आणि त्यानंतर लॉगिन करून अर्ज भरावा. अर्ज करताना १२ वी ची मार्कशीट, पासपोर्ट साइज फोटो आणि आवश्यक कागदपत्रे अपलोड करावी लागतील.

अर्ज सबमिट केल्यानंतर कन्फर्मेशन पेजचा प्रिंटआउट जरूर घ्यावा. ही संधी केवळ सैन्यात भरती होण्याचीच नाही, तर उच्च शिक्षण आणि प्रतिष्ठित करिअर घडवण्याची देखील आहे.




# IAFC सिव्हिलिअन पदांसाठी भरती

भारतीय हवाई दलात (IAF) ग्रुप C सिव्हिलियन पदांसाठी भरती जाहीर करण्यात आली आहे. एकूण १५३ पदांसाठी ही भरती केली जाणार असून, रोजगार समाचाराच्या १७ ते २३ मे २०२५ च्या अंकात याबाबत अधिकृत जाहिरात प्रसिद्ध झाली आहे. इच्छुक उमेदवारांना ही संधी मिळवण्यासाठी जाहिरात प्रसिद्ध झाल्यानंतर ३० दिवसांच्या आत आपला अर्ज संबंधित पत्त्यावर पाठवावा लागणार आहे. या भरतीअंतर्गत विविध पदांसाठी पात्रता आणि वयोमर्यादा वेगवेगळी आहे. मात्र सर्वसाधारणपणे उमेदवाराचे वय १८ ते २५ वर्षांच्या दरम्यान असावे. वयोमर्यादा मोजताना शेवटचा अर्ज पोहोचण्याचा दिवस लक्षात घेतला जाणार आहे. आरक्षित प्रवर्गातील उमेदवारांना केंद्र सरकारच्या नियमानुसार सवलत दिली जाईल.



भरती प्रक्रियेचा विचार केला तर उमेदवारांची निवड लेखी परीक्षा, कागदपत्र पडताळणी आणि वैद्यकीय तपासणीच्या आधारे केली जाणार आहे. विविध पदांसाठी परीक्षेचा नमुना थोडासा वेगळा राहील. एलडीसी, हिंदी टायपिस्ट, एमटीएस, मेस स्टाफ, लाँड्रीमन, हाउस कीपिंग स्टाफ यांसाठी सामान्य बुद्धिमत्ता, इंग्रजी, अंकगणित आणि सामान्य ज्ञान यावर आधारित प्रश्न विचारले जातील. इतर तांत्रिक पदांसाठी त्यासोबत संबंधित विषयांवर आधारित प्रश्नही विचारले जातील.

या भरतीअंतर्गत एलडीसीसाठी १० पदे, हिंदी टायपिस्टसाठी १ पद, कुकसाठी १२, स्टोअर कीपरसाठी १६, सुतार आणि पेंटरसाठी प्रत्येकी ३ पदे, एमटीएससाठी ५३, मेस स्टाफसाठी ७, लाँड्रीमनसाठी ३, हाउस कीपिंग स्टाफसाठी ३१, वल्कनायझरसाठी १ आणि ड्रायव्हरसाठी ८ पदांची भरती होणार आहे. १०वी किंवा १२वी पास उमेदवार या भरतीसाठी पात्र आहेत.काही पदांसाठी संबंधित ट्रेडमधील प्रमाणपत्र किंवा अनुभव आवश्यक आहे. अर्ज पाठवण्याची प्रक्रिया ऑफलाईन आहे. उमेदवारांनी सर्वप्रथम अधिकृत जाहिरात वाचून आवश्यक कागदपत्रांची तयारी करावी. त्यानंतर अर्ज भरून सर्व कागदपत्रे जोडून जाहिरातीत दिलेल्या पत्त्यावर वेळेत पाठवावा.

# एक-दोन नव्हे तर तब्बल २८ प्रश्न चुकीचे! पान ४ वरून...

ही एमबीए-सीईटी परीक्षा १ एप्रिल ते ३ एप्रिलदरम्यान सहा सत्रांमध्ये पार पडली होती. परीक्षेनंतर विद्यार्थ्यांना हरकती नोंदविण्यासाठी २८ एप्रिल ते ३० एप्रिलदरम्यानची मुदत देण्यात आली होती. यामध्ये राज्यभरातून २५३ हरकती प्राप्त झाल्या. या हरकतींमधून १०१ प्रश्नांबाबत शंका उपस्थित करण्यात आली होती. त्यात सर्वाधिक १३४ तक्रारी लॉजिकल रिझनिंग विभागातील होत्या. अबस्ट्रॅक्ट रिझनिंगच्या २१, क्वांटिटेटीव्ह ॲप्टिट्यूडच्या ३५ आणि व्हर्बल ॲबिलिटीच्या ३५ तक्रारी होत्या.

विद्यार्थ्यांनी दाखल केलेल्या या तक्रारींची पडताळणी केल्यानंतर, तीन वेगवेगळ्या सत्रांमध्ये मिळून २८ प्रश्न चुकीचे असल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे संबंधित बॅचमधील सर्व विद्यार्थ्यांना या प्रश्नांकरिता प्रत्येकी एक गुण दिला जाणार आहे. तसेच, सहा प्रश्नांच्या बाबतीत उत्तरपत्रिकाही अद्ययावत करण्यात आली आहे, असे सीईटी सेलने स्पष्ट केले आहे. या निर्णयामुळे काही विद्यार्थ्यांच्या सीईटी गुणांमध्ये महत्त्वाची वाढ होण्याची शक्यता असून, याचा त्यांच्या प्रवेश प्रक्रियेवर परिणाम होऊ शकतो.

कोणत्या सत्रात किती प्रश्न चुकले?

१ एप्रिल सकाळचे सत्रः २ प्रश्न

१ एप्रिल दुपारचे सत्र : १ प्रश्न

२ एप्रिल सकाळचे सत्र : १० प्रश्न

२ एप्रिल दुपारचे सत्र : ४ प्रश्न

३ एप्रिल सकाळचे सत्र : २ प्रश्न

३ एप्रिल दुपारचे सत्र : ९ प्रश्न

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट ॲण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2010/34125
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813